**प्रकल्प प्रवर्तक मे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल), अदानी कॉर्पोरेट हाऊस, शांतीग्राम, वैष्णोदेवी सर्कलजवळ, एस.जी. महामार्ग, खोडीयार, अहमदाबाद - ३८२ ४२१, राज्य-गुजरात यांच्या प्रस्तावित मराठवाडी, भारसाखळे, निवकणे आणि म्हारवंड, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा,महाराष्ट्र येथील ३६१.८२ हेक्टर क्षेत्रात निवकणे (एकात्मिक/Integrated) उदंचन जलविद्युत (पंप साठवण) प्रकल्प (२७०० मेगावॅट) (Nivakane (Integrated) Pumped Storage Project -२७०० MW) उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल), अदानी कॉर्पोरेट हाऊस, शांतीग्राम, वैष्णोदेवी सर्कलजवळ, एस.जी. महामार्ग, खोडीयार, अहमदाबाद - ३८२ ४२१, राज्य-गुजरात यांच्या प्रस्तावित मराठवाडी, भारसाखळे, निवकणे आणि म्हारवंड, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा,महाराष्ट्र येथे ३६१.८२ हेक्टर क्षेत्रात निवकणे (एकात्मिक/Integrated) उदंचन जलविद्युत (पंप साठवण) प्रकल्प २७०० मेगावॅट ( Nivakane (Integrated) Pumped Storage Project २७०० MW) उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मौजे जवरातवाडी, ग्रा. भारसाखळे, निवकणे-मराठवाडी रस्ता, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र, येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री.अमोल आ. सातपुते, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी मा. श्री. नागेश पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, श्री. बाबासाहेब कुकडे, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या असलेल्या स्थानिक नागरिक, पोलिस प्रशासन यांचे जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांच्यावतीने स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ , जून, २०१४ आणि एप्रिल, २०२२ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि त्यातील सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ए १ (सी) -River Valley/Irrigation Projects, River Valley and Hydroelectric Projects अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल

मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम याबाबत माहिती देणे तसेच प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की, प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २८/०७/२०२३ रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने दिनांक ०७/०८/२०२३ रोजी कोयना-निवकणे पंप स्टोरेज नावाने - २४५० मेगावॅट क्षमतेसाठी मंजूरी प्रदान केली होती. तदनंतर प्रकल्पाचे नांव कोयना-निवकणे पीएसपी वरुन निवकणे (एकात्मिक) पीएसपी असे बदलण्यात आले. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी दि. २५/०५/२०२३ रोजी सुधारित टीओआर प्राप्त करण्याकरीता ऑनलाईन अर्ज सादर केला. व त्यास दि. ०४/०८/२०२५ रोजी निवकणे (एकात्मिक) पीएसपी नावाने २७०० मेगावॅट क्षमतेसाठी मंजूरी प्रदान करण्यात आली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्ती करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण डिसेंबर, २०२४ ते ऑगस्ट २०२५ (दहा महिने).या कालावधीत पुर्ण करण्यात आले,ज्यामध्ये हिवाळा, उन्हाळा (पावसाळा पूर्व) आणि पावसाळा या ऋतूचा आहे. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल), अदानी कॉर्पोरेट हाऊस, शांतीग्राम, वैष्णोदेवी सर्कलजवळ, एस.जी. महामार्ग, खोडीयार, अहमदाबाद - ३८२ ४२१, राज्य-गुजरात यांच्या प्रस्तावित मराठवाडी, भारसाखळे, निवकणे आणि म्हारवंड, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा,महाराष्ट्र येथे ३६१.८२ हेक्टर क्षेत्रात निवकणे (एकात्मिक/Integrated) उदंचन जलविद्युत (पंप साठवण) प्रकल्प (२७०० मेगावॅट) (Nivakane (Integrated) Pumped Storage Project २७०० MW) उभारणी करणे संदर्भात प्रकल्प प्रवर्तक यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई मुख्यालयाकडे दिनांक २१/११/२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर केला व प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याबद्दल मागणी केली

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्र.एमपीसीबी/जेडी (डब्ल्यूपीसी)/ईएव्ही-पीएच/बी-२५१२०५-एफटीएस-०२८८ दिनांक ०५/१२/२०२५ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी पत्र क्र.एमपीसीबी/एसआरओएसटी/२५१२१८-एफटीसी-०१३४ दिनांक १८/१२/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, सातारा यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी करीता तारीख व वेळ देण्याबाबत विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १३/०१/२०२६ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११. ०० वाजता प्रकल्प ठिकाणी घेणेबाबत मान्यता दिल्यानंतर, मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-९१/२०२६, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी(डब्लुपीसी)पीएच/बी-२६०२०२ एफटीएस -००८६ दिनांक ०२/०२/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी -पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी, सातारा एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत १७ जानेवारी, २०२६ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज ( मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल ) लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा.
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सातारा
३. महाव्यवस्थापक,जिल्हा उदयोग केंद्र , सातारा
४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय) कल्पतरु पॉईंट , ३ रा व ४ था मजला, सायन माटुंगा, स्किम रोड क्र ८ , सायन सर्कल समोर, सायन (पूर्व) , मुंबई- ४०००२२ .
५. प्रादेशिक अधिकारी , म. प्र. नि. मंडळ , जोग सेंटर, ३ रा मजला , वाकडेवाडी, जुना पुणे - मुंबई रोड पुणे ४११ ००३
६. पर्यावरण विभाग,नविन प्रशासकीय भवन १५ वा मजला,मादाम कामा मार्ग,मंत्रालय मुंबई-३२

७. उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नविन प्रशासकीय इमारत २ रा मजला एसटी स्टँडच्या पाठीमागे , सदरबझार सातारा.

८. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४० ००१.

९. उपविभाग अधिकारी कार्यालय, उपविभाग कार्यालय-पाटण,तालुका-पाटण,जिल्हा-सातारा.

१०. तहसील कार्यालय, पाटण,तालुका-पाटण,जिल्हा-सातारा.

११. गटविकास अधिकारी कार्यालय,पंचायत समिती,पाटण,तालुका-पाटण, जिल्हा-सातारा.

१२. ग्रामपंचायत कार्यालय-निवकणे, भारसाखळे, मराठवाडी, आरळ, चाफोली,पिटेवाडी,जळू,निवडे,सावरघर, कुशी, कुसवडे, रामेळ, जीमणवाडी, भोकरवाडी, जळव, कळंबे, मार्लोशी, वाघळवाडी, ढोरोशी, मंदुरे, म्हारवंड, डफळवाडी,केरळ,लुगडेवाडी,खिवशी, धानवी, धुईलवाडी, घानव, जुनगती,मेंढोशी,दिवशी खु., अंबवणे, चिटेघर, घाणबी, साखरी, गावडेवाडी, काठी, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा.

१३. संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आयोजक यांनी आजपर्यंत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना प्रकल्पाविषयी काल संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत ४१ सूचना/आक्षेप प्रत्यक्ष अथवा ई मेल द्वारे प्राप्त झालेबाबत सांगितले.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास तशी संधी प्रकल्पाबाबतचे सादरीकरण झाल्यानंतर देण्यात येईल असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेऊन पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण सादर केले.

त्याअगोदर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस उपस्थित असलेले माननीय भारत पाटणकर सरांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

श्री भारत पाटणकर सर यांनी मत मांडले की पर्यावरण हा विषय मोठा आणि गंभीर आहे. हा विषय प्रदूषणापेक्षा फार मोठा आहे. प्रदूषणात जल, हवा, धुळीपासून होणार प्रदूषण आपण म्हणू शकतो. मात्र पर्यावरणामध्ये सर्व जीवांचा नैसर्गिक अधिवास, त्यांचे सहवास, सहअस्तित्व ज्यास

आपण Healthy Existence म्हणतो, इजा कोणाला होणार नाही - जंगलांना, प्राण्यांना, मातीला इजा होणार नाही. पर्यावरण हा एक व्यापक विषय आहे. सह्याद्रीचे एक वेगळे कॅरेक्टर आहे, सह्याद्रीचा अभ्यास गाडगीळ कमिटीकडून झालेला आहे. तर याच्यामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ही सक्षम प्राधिकरण - Competent Authority होऊ शकत नाही. तरी जरी आपण येथे आलेला आहात, तरीही आपण Authority होऊ शकत नाही, असा माझा आक्षेप आहे. आमचे म्हणणे आहे की ही जनसुनावणी होऊच शकत नाही. दुसरी अशी मागणी आहे की जिल्हाधिकारी यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी येथे आलेले आहेत. परंतु या सर्व प्रकल्पांना National Rehabilitation Policy, २००७ ही लागू आहे. त्या धोरणानुसार ही सुनावणी होणार नाही, कारण ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. पण होणारच असेल, तर येथे अपर जिल्हाधिकारी पदावर असलेले अधिकारी येथे अध्यक्ष म्हणून असणे गरजेचे आहे. माझ्या या आक्षेपाची नोंद घेण्यात यावी.

मात्र ही पर्यावरणविषयक जनसुनावणी चालूच ठेवली, तर मला बोलावेच लागेल आणि आम्ही इतर सर्व विषयांवर बोलणार. तर त्याची नोंद घेण्यात येणार का? ही जनसुनावणी रद्द करुन ती परत आयोजित करण्यात यावी आणि त्यावेळी शासनाची इतर संबंधित विभागांनाही पुढील जनसुनावणीत बोलाविण्यात यावे. तरी माझ्या आक्षेपांची नोंद घेण्यात यावी व सादरीकरणानंतर इतर मुद्दे उपस्थित करण्यात येतील.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की भारत सरकारच्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार काही विशिष्ट प्रकल्पांना प्रकल्प सुरु करण्याअगोदर पर्यावरण अनुमती (ईसी) प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे आवश्यक असुन या बैठकीचा मूळ उद्देशच स्थानिकांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी असणा-या भावना व त्यांना प्रस्तावित प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजना (ईएमपी) अवगत करणे हा आहे. अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे फक्त बैठकीचे समन्वयक (Convener) असतात. तसेच सदरहू बैठकीचे अध्यक्ष हे जिल्हादंडाधिकारी असतात व त्यांच्या पूर्वपरवानगीनेच ही जनसुनावणी आयोजित करण्यात येते. जिल्हाधिकारी यांनी उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती केलेली असली, तरीही या बैठकीत त्यांना अपर जिल्हादंडाधिकारी या पदस्तराची मान्यता असते. हा मा. जिल्हाधिकारी यांचा विशेषाधिकार आहे.

त्यावेळी श्री भारत पाटणकर सरांनी आक्षेप नोंदविला की शासनाच्या इतर विभागांचे अधिकारी बैठकीत असणे अपेक्षित आहे. त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले ईआयए अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी सदस्य समिती व त्या समितीची कार्यकक्षा याबाबत पारित निर्देश पाळणे बंधनकारक आहे. श्री भारत पाटणकर यांनी याबाबत आक्षेप नोंदविताना सांगितले की जरी आम्ही इतर मुद्दे उपस्थित केले, तरीही आपण फक्त नोंद घेणार आहात, मात्र त्याबाबत पुढील कार्यवाही करणार नाहीत.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ईआयए अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा हेतू हा मर्यादित प्रमाणात ठेवलेला आहे. प्रस्तावित प्रकल्पाविषयी प्रकल्पबाधित व्यक्ती, स्थानिक लोक यांनी उपस्थित केलेले पर्यावरणीय आक्षेप

नोंदविण्यासाठी ही समिती गठित करण्यात येते. बैठकीच्या सुरवातीसच आयोजक यांनी सांगितलेले आहे की ही समिती प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय घेत नाही, प्रकल्प नाकारत नाही किंवा प्रकल्पाची शिफारससुध्दा करत नाही. बैठकीचा सर्व अहवाल हा भारत सरकारला सादर करण्यात येतो, आणि तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढीस निर्णय घेत असते.

अध्यक्ष यांनी पुढे प्रतिपादन केले की ही जनसुनावणी झाल्यानंतरही जर काहींना लेखी सूचना/आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते लेखीस्वरुपात सादर करु शकता. बैठकीच्या इतिवृत्तासोबत ते शासनास सादर करण्यात येतील.

आयोजक यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या आदेशानुसार प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्प व त्यातील पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती देण्याची सूचना केली. त्यांनी सर्व उपस्थितांना सूचना केली की सादरीकरणानंतर उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार किंवा आक्षेप नोंदविताना प्रथम स्वतःचे नाव व गावाचे नांव सांगूनच आक्षेप नोंदवावेत. त्याची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल.

त्यावेळी काही उपस्थितांनी सादरीकरण करताना एक-एक स्लाईडनुसार सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जनसुनावणीच्या पध्दतीनुसार प्रथम सर्व सादरीकरण करण्यात येईल. ज्यांना एखाद्या स्लाईडवर सूचना करावयाची असले त्यांनी तो स्लाईड नंबर लक्षात ठेवावा. ती स्लाईड परत दाखविण्यात येईल. जोपर्यंत शेवटचा आक्षेप नोंदविला जाणार नाही, तोपर्यत ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संपणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रथम सर्व सादरीकरण झाल्यानंतर परत ते दाखविण्यात येईल.

**त्यावेळी एडव्होकेट सिध्देश पवार यांनी सांगितले** की आमची विनंती आहे की जी स्लाईड समोर असेल, त्या मुद्याबाबत सूचना/आक्षेप हे नोंदविण्यात यावेत.

त्यावेळी यांनी आक्षेप नोंदविला की येथील उपस्थितांपैकी बरेचजण सर्व सादरीकरण लक्षात ठेवू शकणार नाहीत.

**त्यावेळी श्री. बाळासाहेब सपकाळ यांनी मागणी केली** की सर्वांच्या मागणीनुसार प्रत्येक स्लाईडप्रमाणे चर्चा व्हावी. कारण उपस्थितांपैकी बरेचजण तेवढे लक्षात ठेवू शकणार नाही, येथील ३०-४०% उपस्थितांना स्वाक्षरी करता येत नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले प्रथम सर्व सादरीकरण पूर्ण करुन परत प्रत्येक स्लाईड दाखवून त्याबाबत आपल्या सूचना, आक्षेप नोंदविण्यात येतील.

पर्यावरण सल्लागार त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड यांनी मराठवाडी, भारसाखळे, निवकणे आणि म्हारवंड, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा,महाराष्ट्र येथे ३६१.८२ हेक्टर क्षेत्रात निवकणे (एकात्मिक/Integrated) उदंचन जलविद्युत (पंप साठवण) प्रकल्प (२७०० मेगावॅट) (Nivakane (Integrated) Pumped Storage Project -२७०० MW) उभारणी करण्याचे योजिलेले आहे. उदंचन जलविद्युत (पंप स्टोरेज) प्रकल्प हा जलविद्युत केंद्राचा एक खास प्रकार आहे, ज्याला 'वॉटर बॅटरी' म्हणूनही ओळखले जाते. उदंचन जलविद्युत प्रकल्प

(Pumped Storage Projects) हे उर्जा साठवण्याचे साधन किंवा बॅटरी म्हणून काम करतात. याव्दारे दिवसा मिळणारी सौर किंवा पवन ऊर्जा साठवून ठेवली जाते आणि गरजेच्या वेळी तिचा वापर केला जातो. वीज निर्मितीच्या टप्प्यात (Generating Phase) तेच पाणी गुरुत्वाकर्षणाव्दारे वरच्या जलाशयातून खालच्या जलाशयात सोडले जाते, ज्यामुळे वीज निर्माण होते आणि ती विद्युत प्रवाहाव्दारे ग्रीडव्दारे (ग्रीड) पुरविली जाते.

जेव्हा प्रकल्प वीज निर्मिती करत नाही, तेव्हा ग्रीडमधील उपलब्ध अतिरिक्त सौर किंवा पवन उर्जेचा वापर करुन पाणी खालील जलाशयातून वरिल जलाशयात पंप केले जाते. क्लोज लूप पंप स्टोरेज प्रकल्पात दोन जलाशयांतील पाणी सतत पुनर्वापर (वर खाली) केले जाते.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित निवकणे (एकात्मिक) पीएसपी हा 'ऑफ-स्ट्रीम क्लोज्ड लूप' प्रकारचा उचंदन जलविद्युत प्रकल्प आहे. प्रस्तावित योजनेत दोन नवीन जलाशयांच्या बांधकामाचा विचार करण्यात आलेला आहे. वरचा जलाशय (Upper Reservoir) आणि खालचा जलाशय (Lower Reservoir). दोन्ही जलाशय 'वॉटर कंडक्टर सिस्टिम' (पाणी वाहून नेणारी यंत्रणा) व्दारे एकमेकांशी जोडले जातील. या उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी लागणारे २९.५७ दशलक्ष घनमीटर (एमसीएम) पाणी एकदाच भरुन घेतले जाईल, तसेच बाष्पीभवनामुळे होणारी वार्षिक १.६० दशलक्ष घनमीटर ( एमसीएम) पाण्याची तूट साखरी-चितेघर धरणामधून भरुन काढली जाईल. जलसंपदा विभागाची वार्षिक गरज ७.६२ दशलक्ष घनमीटर (एमसीएम) असून हे पाणी खालच्या जलाशयात साठवले जाईल.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पापासून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे अंतर हे ०.५ कि.मी. एवढे आहे.

प्रकल्प परिसरतील विविध पक्ष्यांबाबत माहिती सांगताना ती स्लाईड परत दाखविण्याची मागणी श्री भारत पाटणकर यांनी केली. तसेच उपस्थितांनी स्लाईड नंबर लक्षात ठेवण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व पुर्ण झाल्यानंतर योजिलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेची सविस्तर माहिती सांगितली.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की सादरीकरण पूर्ण झालेले असून उपस्थितांच्या मागणीनुसार परत प्रत्येक स्लाईड ही दाखविण्यात येत आहे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी सर्वात प्रथम ऑफस्ट्रीम क्लोज लुप प्रणाली म्हणजे काय याची माहिती सांगण्यात यावी. तसेच ईआयए (EIA) अधिसूचनेनुसार प्रकल्पाची श्रेणी कोणती आहे, संवर्ग अ आणि ब (Category A & B) म्हणजे काय, त्यातील फरक सांगण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की क्लोज्ड लुप ऑफस्ट्रीम मध्ये दोन वेगवेगळी धरणे बांधली जातात. त्यावेळी आयोजक यांनी स्लाईडव्दारे स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. एकात पाणी साठविले जाते. आपण तेच तेच पाणी परत वापरत असतो. नविन पाण्याचा बाहेरुन उपसा आपण करत नाही. आपण साठविलेले पाणी पुन्हा पुन्हा वापरले जाते, म्हणून या प्रकल्पास क्लोज्ड लुप ऑफस्ट्रीम प्रणाली म्हटले जाते. या प्रकल्पात परत परत तेच पाणी वापरतो, तेच पंप करतात व तेच तेच वापरले जाते.

त्यावेळी एका उपस्थित व्यक्तीने विचारणा केली की ते पाणी किती दिवस वापरले जाणार. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की तेच तेच पाणी परत वापरण्यात येणार आहे. त्यावेळी उपस्थिताने खाली कसे सोडणार याबाबत विचारणा केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले तेच तेच पाणी खाली सोडण्यात येते.

एका उपस्थितानी वरुन खाली सोडलेल्या पाण्याचा पी.एच. किती याबाबात विचारणा केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपण पाण्याचा पी.एच. बदलत नाही. ही शंभर वर्षांची जुनी प्रणाली आहे. सर्व हायड्रो प्रकल्प हे त्याचप्रमाणे चालतात. या पाण्यात काहीही मिसळले जात नाही. वेळोवेळी पाणी तपासणी करण्यात येते. जे पाणी वरुन खाली येते, ते मशिनवर पडून परत वर पाठविण्यात येते. ही शंभर वर्षे वापरलेली जुनी प्रणाली आहे. हीच सर्व जगात वापरली जाते.

त्यावेळी दुस-या एक व्यक्तीने विचारणा केली की प्रकल्पात वरिल बाजू (Upper Side) आणि खालील बाजू (Lower Side) कुठे असणार आहे? प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की खालील बाजू (Lower Side) ही निवकणे गावात, तर वरिल बाजू (Upper Side) मराठवाडी गावात असेल.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी नदीचा प्रवाह हा स्वतंत्र राहणार आहे काय याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. तसेच सुरवातीस (initial filling) किती पाणी लागेल? तसेच बाष्पीभवनामुळे पाण्याचे किती नुकसान (losses) होईल? बाहेरुन पाणी घ्यावे लागेल का आणि किती पाणी घेणार? पावसाळ्यात पूरपरिस्थितीवर प्रकल्पाचा काही परिणाम होणार का, किंवा पाऊसच पडला नाही तर प्रकल्प कसा कार्यान्वित ठेवण्यात येणार, आणि प्रकल्पास पाणी कमी पडल्यास नदीपात्रातून पाणी उपसा करणार काय? याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना माहिती सांगितली की यात एक चांगली गोष्ट करत आहोत की महाराष्ट्र शासनाचे जल संपदा विभाग (Water Resources Department) आहे, त्यांनी आम्हांला विनंती केली की जे खालच्या दिशेला सिंचनासाठी पाणी लागणार आहे, ते आपण साठवून ते ७.६२ एमसीएम पाणी साठवून ते सिंचनासाठी वर्षभर पुरविणार का? त्यांच्याशी आमची प्राथमिक बोलणी झालेली असून आम्ही कळविलेले आहे की प्रकल्प प्रवर्तक करार करुन ते ७.६२ एमसीएम पाणी वर्षभर साठवून सिंचनासाठी उपलब्ध करुन देणार आहोत. त्यासाठी आम्ही कोणतेही अतिरिक्त पैसे घेणार नाही. म्हणजे या भागाला फायदाच होणार आहे की ते पाणी आपण सिंचनासाठी वापरू शकतो.

त्यावेळी श्री प्रशांत पाटणकर यांनी विचारणा केली की ७.६२ एमसीएम पाणी पुरेल का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की जे पाणी पावसाळ्यात वाहून जाते, तेच पाणी फक्त ७.६२ एमसीएम आम्ही सर्वांना देणार आहोत.

**त्यावेळी श्री प्रदिप निकम यांनी** मत मांडले की ज्यावेळी दुष्काळ पडेल किंवा पाणी ओव्हर फ्लो होईल, जेव्हा पाऊस जास्त होईल. त्याबाबत काय उपाययोजना करणार आहात याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **एडव्होकेट सिध्देश पवार, राहणार- अभ्यास क्षेत्रामधील १२४ गावातील मी रहिवाशी आहे गाव-बांबवडे, तालुका-पाटण जे प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येमध्ये येत आहे.**

त्यांनी आक्षेप नोंदविला की लोकांच्या माहितीसाठी जो पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अहवाल उपलब्ध करुन दिलेला होता, त्यामधील माहिती आणि सादरीकरण हे वेगळे आहे. सादरीकरणातील स्लाईड्स या वेगळ्या आहेत. यामध्ये स्लाईड्स या जास्त आहेत किंवा ईआयए अहवालातील मजकूर सादरीकरणात दिसत नाही. तर मी जे आक्षेप नोंदविणार आहे, ते ईआयए अहवालानुसार असून त्याबाबत मला वेगळे उत्तर अपेक्षित आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार येथे spill-way करुन देण्यात येणार आहे. आम्ही कुठलेही पाणी अडवून ठेवणार नाही. जे काही पाणी असेल, ते खाली सोडण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाने आम्हांला विनंती प्रश्न विचारलेला आहे की ७.६२ एमसीएम पाणी आमच्या प्रकल्पात थांबवून/अडवून ते परत पाटबंधारे विभागास देणार आहात काय. तर लोकांची मागणी असेल तर तेही आम्ही करण्याचा मानस आहे. नाही तर आम्ही सर्व पाणी खाली सोडून देणार आहोत.

२) <u>श्री जानु जोरे, राहणार-जवरातवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-</u>

आपण खालील बाजूचे (Lower Side) पाणीसाठा/Reservoir विषयी माहिती सांगत होता. तसेच वरच्या बाजूचे (Upper Side) पाणीसाठा/Reservoir आहे, तेथे मराठवाडी, जवरातवाडी ही गावे आहेत. त्यांचे बाराही महिने शेतीचे पाणी आहे. प्रकल्पाच्या जसे खालील बाजूस (Lower Side) आपण जे पाणी साठवण योजना राबविणार आहात, तशी वरच्या बाजूचे (Upper Side) पाणीसाठा/Reservoir आहे, तेथे राबविण्याची काही योजना आहे काय?

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी वरिल प्रश्नाबरोबरच प्रकल्प परिसरात किती भूजल पातळी आढळून आली, प्रस्तावित प्रकल्पामुळे भूजल पातळी ही कमी होईल का वाढेल? परिसरातील विहिंरींवर, बोअर वर काही परिणाम होणार का? त्याबाबत नियोजित उपाययोजने बाबत स्पष्टीकरण मागितले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की प्रथम श्री जोरे यांच्या प्रश्नास उत्तर देण्यात येत आहे. प्रथम खालून वरच्या पाणी साठवणवर पाणी नेण्यासाठी आम्हांला वीज लागते. ते कनेक्शन हे वरच्या बाजूसच घ्यावे लागेल. वरच्या बाजूस जे पावसाळ्यात पाणी येईल, ते सर्व खाली सोडून देणार आहोत. वरच्या जलाशयात आम्ही अतिरिक्त पाणी ठेवणारच नाही. जे पाणी खालच्या जलाशयात असेल, ते पंप करुनच वर नेण्यात येईल.

३) <u>श्री उदय शेळके, राहणार-जवरातवाडी गाव, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा</u>

आपण जे उत्तर दिले, ते पावसाळ्याबाबत देण्यात आलेले आहे. मात्र उन्हाळ्यात काय करण्यात येईल?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की उन्हाळ्यासाठी महाराष्ट्र शासनाची जर काही योजना असल्यास ती राबविण्यास आम्ही तयार आहोत. हा प्रकल्प जसा पावसाळ्यात चालू असतो, तसाच तो उन्हाळ्यातही चालू राहिल.

४) <u>उपस्थित (नांव सांगितले नाही)</u>

आमची जवरातवाडी, मराठवाडी येथील बारमाही शेती व पिण्याचे पाणी हे सर्व पाण्यावरच अवलंबून आहेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की तेथील पाणी आम्ही घेणारच नाही. प्रकल्पात खालच्या धरणाचे/टाकीचे पाणी हे वीजेच्या सहाय्याने वरच्या धरणात घेणार आहोत.

त्यावेळी उपस्थित यांनी आक्षेप नोंदविला की गट नं. ९४ येथून पाणी येते. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी त्या स्थळाचा अभ्यास करुन पुढील उपायोजना करण्याचे आश्वासन दिले.

५) **<u>श्री भारत पाटणकर सर, जेष्ठ पर्यावरणवादीः-</u>**

आपण चुकीची माहिती देत आहात. जेव्हा आपण खालच्या धरणातून पाणी उचलणार, वीजेव्दारे वर नेणार व परत खाली सोडणार, तर त्याठिकाणी पाण्याचे नुकसान (loss) होणारच. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पाण्याचा लॉस होत नाही. श्री भारत पाटणकर यांनी मत मांडले की हे चुकीचे म्हणणे आहे. पाण्याचा लॉस होणारच.

तसेच प्रकल्पात खालच्या धरणाचे पाणी वर धरणात वीजेने घेणार व नंतर खाली सोडणार. यात transmission मध्ये लॉस होणारच. तो लॉस पाईपला पाणी लागून, घर्षणामुळेही होईल. पण लॉस हा होणारच. हा एक भाग.

दुसरा भाग पाणी लोकांना खाली कधी लागते? तर धरणाचे पाणी साधारणपणे मार्च, एप्रिलनंतर लागते. मग पुढे येथे प्रश्न उभा राहणार की प्रकल्पास पाणी द्यायचे की येथील नागरिकांना पाणी द्यायचे. त्यावेळी जर आपणास पाणी पुरवरठ्याची हमी मिळालेली असेल, तर खालच्या बाजूच्या लाभक्षेत्रास ते देता येणारच नाही. त्यामुळे खालच्या सिंचनावर परिणाम होणार. प्रकल्पात जरी खालच्या धरणातील पाणी वीजेने वरच्या धरणात घेणार व परत खाली सोडणार, तरीही ते सिस्टिममध्ये राहणार आहे. ते लाभक्षेत्रात जाणार नाही. खालच्या बाजूच्या सिंचनावर परिणाम हा होणार.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण दिले की जो लॉस होतो, तो वीजेमध्ये होतो. पंप करताना अतिरिक्त २०% वीज वापरावी लागते. मात्र पाण्याचा लॉस होत नाही. महाराष्ट्र शासनाचा पाटबंधारे विभाग जे ७.६२ एमसीएम पाणी आम्हांला देण्यास तयार आहे, ते आम्ही वेगळेच ठेवणार आहोत. प्रकल्पात २९.५७ एमसीएम पाणी लागणार आहे. तेच वापरु, मात्र ७.६२ एमसीएम पाणी हे वेगळेच ठेवण्यात येणार आहे.

श्री भारत पाटणकर यांनी आक्षेप नोंदविला की मात्र ७.६२ एमसीएम पाणी हे वेगळेच ठेवण्यात येणार आहे याचा उल्लेख कुठेही नाही. येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी लेखी हमी देण्याची तयारी दर्शविली.

श्री भारत पाटणकर यांनी मत मांडले की प्रकल्प अधिका-यांवर आम्ही विश्वास ठेवू शकत नाही. जर प्रकल्प प्रवर्तकांबरोबर पाटबंधारे विभागाची वरिष्ठ पातळीबरोबरची बैठक व त्याबाबतचा अहवाल मिळाल्यानंतरच आम्ही विश्वास ठेऊ. प्रकल्प व्यवस्थापन, आम्ही स्थानिक नागरिक यांची संयुक्त बैठक कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्यासोबतच झाली पाहिजे. तरच स्थानिक पुढील विचार करतील.

६) **<u>श्री बाबुजी बोडके, मौजे-जवरातवाडी, तालुका-पाटण. जिल्हा-साताराः-</u>**

जवरातवाडी व मराठवाडी गावातील लोकसंख्या ही १,५०० ते २,००० आहे. आमच्या दोन्ही गावात बुचचावरे येथील गट नं-१००३, आणि गाव दिवशी हद्दीमधील गट नं. १०३, ९५, ९२, ९१ येथील संपूर्ण भागात पाण्याचे स्त्रोत आहेत. तर कंपनीच्या लेआऊटमध्ये या सर्व गट नंबरमधील जमिनीचे कंपनीने अधिग्रहित केल्याचे दिसून येत आहे. श्री भारत पाटणकरसरांनी

उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे. आमचे बारमाही पीक असते, भात निघाला की नंतर गहू, नंतर मका, आमची कडधान्ये आम्ही घेत असतो. आमची जनावरे आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करण्यात यावा. आम्हांला बाराही महिने पाणी नो क़ॉस्टचे मिळते. ते आमचे नो कॉस्ट असलेले पाणी, दोन्ही गावात बैठक होऊन किती ओलिताची जमिन जाते याबाबत चर्चा होईल. तर ते नैसर्गिक पाणी जे आम्हांला नो कॉस्ट मिळते, ते आता जसे मिळते, तसेच दोन्ही गावांना कुठलाही अडथळा न येता मिळालेच पाहिजे. प्रकल्प प्रवर्तक यांनी जसे आता बाराही महिने नैसर्गिक पाणी मिळते, तसेच ते मिळण्याचे आश्वासन दिले.

श्री बाबुजी बोडके यांनी पुढे शंका व्यक्त केली की प्रकल्प उभारणी करताना आपण जे सुरुंग लावून स्फोट करणार आहेत, त्यामुळे आमच्या येथील नैसर्गिक जलस्त्रोतांच्या प्रवाहावर अडथळा, बाधा व जलस्त्रोत दिशा बदलणे असे होऊ नये याबाबत प्रथम अभ्यास करण्यात यावा. कारण आमच्या जवरातवाडी व मराठवाडी गावातील ८०-९०% जमिन ही प्रकल्प बाधित होत आहे. आमच्या शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. तसेच जनावरांना पिण्यासाठी पाणी आवश्यक आहे. त्याबाबत आपण सर्वांच्या हिताचा निर्णय घेण्यात यावा. त्यावेळी काही उपस्थितांनी प्रक्रिया न केलेले पाणी, नैसर्गिक पाणी पुरवठा मिळाला पाहिजे अशी मागणी केली.

श्री बाबुजी बोडके यांनी सांगितले की आमच्या गावात बारा महिने राहणारे जीवंत पाण्याचे स्त्रोत आहेत. तेथे पाटाचे पाणी काढत आहेत. तर दोन्ही गावात पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी लागणारे पाणी, जनावरांसाठी लागणारे पाणी हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. तो प्रश्न प्राधान्याने घ्यावी ही विनंती.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सद्यस्थितीत जवरातवाडी व मराठवाडी गावांना पाण्यासाठी कोणता स्त्रोत आहे याबाबत विचारणा केली.

त्यावेळी श्री प्रदिप निकम, यांनी सांगितले की आमच्या गावाशेजारी भांबे गाव आहे. तेथेही हाच प्रश्न आहे.

(७) <u>श्री. कृष्णात यादव, सरपंच, मराठवाडी ग्रामपंचायत दिवशी खुर्द –</u>

आमचा महत्वाचा प्रश्न आहे म्हणजे पिण्याचे पाणी. आपण शेतीला पाणीपुरवठा कराल. आम्हांला जो नैसर्गिक पाण्याचा जो स्त्रोत आहे, तो कुठेही नाही. आम्हांला जे नैसर्गिक शुध्द पाणी मिळते, तेच आम्हांला मिळावे. तसेच आमच्या दोन गावातील म्हणजे जवरातवाडी व मराठवाडी येथील सुमारे दोन हजार जनावरे या क्षेत्रात चरतात. त्यांचाही पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. तर आम्हांला मिळणा-या नैसर्गिक पाण्याबाबत आपण काय निर्णय घेणार याचे उत्तर देण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की याबाबत लेखी उत्तरसुध्दा देण्यात येणार आहे.

८) <u>श्री बाळासाहेब सपकाळ, राहणार-सावरघर,जिल्हा-साताराः</u>

आपण एक मुद्दा उपस्थित केला की पाटबंधारे विभाग आपणास खालील एल.आर. धरणातून ७.६२ एमसीएम पाणी साठवणीसाठी (स्टोरेजसाठी) देणार आहे. तर खालील एल.आर. धरणाची क्षमता किती एमसीएएमची आहे व त्यामध्ये आपण जो पाणीसाठा करणार आहात, त्यातून ७.६२ एमसीएम पाणी देणार का खालील धरणाचे पाणी ७.६२ एमसीएम घेऊन तेच परत करणार आहेत?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की, सध्याची एल.आर. धरणाची क्षमता ७.२४ एमसीएम एवढी आहे. तर पाटबंधारे विभागानेच आम्हांला सुचविले की नविन धरण बांधण्यास

त्यांना ३५० कोटी रुपयाचा खर्च येणार आहे. तर आपण जर धरण बांधणार आहात, तर त्याची उंची वाढवून ७.२४ एमसीएम पाणीसाठा आम्हांला सिंचनासाठी उपलब्ध करुन द्यावा ही त्यांची मागणी होती.

श्री सपकाळ यांनी सांगितले की आता जे धरण आहे, ते मातीचे धरण आहे. तर उंची वाढवताना पूर्ण पाया काढून नविन बांधणार वा भिंतीची उंची वाढविण्यात येणार आहे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की भारत सरकारचे सेंट्रल इलेक्ट्रीसिटी ऑथरटी व सेंट्रल वॉटर कमिशन हे दोन्ही विभाग आहेत. त्यांच्याकडूनच सर्व धरणांना ना हरकत मंजूरी दिली जाते. तर ते दोन्ही संबंधित विभाग जे निर्देश देतील, त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे.

श्री सपकाळ यांनी विचारणा केली की आता जे सांगितले की ७.६२ एमसीएम पाणी साठा आपल्याकडे राहणार आहे, ते बारमाही वापरण्यास येथील गावातील लोकांना उपलब्ध करणार का यास प्रकल्प प्रवर्तक यांनी होकारार्थी उत्तर दिले. श्री सपकाळ यांनी विचारणा केली की या ७.६२ एमसीएम पाणी साठ्यातून काही भाग हा आपल्या वीजनिर्मितीसाठी वापरण्यात येणार आहे का, यास प्रकल्प प्रवर्तक यांनी नकारार्थी उत्तर दिले.

श्री सपकाळ यांनी आक्षेप नोंदविला की जो नविन जलसाठा आपण वापरणार आहात, त्याबाबत कोणतीही माहिती पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालात नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जे काही पाणी साठवण होईल, ते सर्व सोडण्यात येणार आहे. पाटबंधारे विभागाने आम्हांला विनंती केलेली आहे की शेतक-यांचा फायदा हा झालाच पाहिजे. पाटबंधारे विभागाने सांगितले की त्यांची योजना ७.६२ एमसीएम पाणी साठवण आम्ही राबवावी. तरी याबाबत आपल्या काही सूचना,विचार असतील तर पाटबधारे विभागास त्या सादर करण्यात याव्यात, त्या सूचना ते आम्हांला बंधनकारक करतील.

श्री बाळासाहेब सपकाळ यांनी मागणी केली की आपण जो अतिरिक्त पाणीपुरवठा करणार आहात, त्यात कोणती गावे येतात, किती पाणीपुरवठा होणार, याचा सर्व अहवाल स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात यावा.

तसेच वरिल जलाशय (Upper Reservoir) बाबत वरिल गावातील ग्रामस्थांची वारंवार मागणी होत आहे की त्यांचा बारमाही पाणी मिळण्याचा जो स्त्रोत आहे, झरे आहेत, त्यातून बारमाही शेतीला पाणी मिळते. त्यांना भिती वाटते की प्रकल्पात पाणी प्रदूषित होईल. आपण ते पाणी द्याल, पण ते प्रदूषित असेल. तर त्यांचे नैसर्गिक स्त्रोतातील पाणी त्यांना मिळावे अशी योजना प्रकल्प प्रवर्तकांनी आखलेली आहे काय.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना माहिती दिली की याबाबत अभ्यास करण्यात येईल. आम्ही वारंवार सांगत आहोत की हायड्रो प्रकल्पामुळे प्रदूषण होतच नाही. तसेच पाण्याची गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होऊन त्याचा अहवाल हा शासनास नियमितपणे सादर करण्यात येतो.

त्यावेळी श्री प्रदिप निकम, यांनी सांगितले की कुठलाही खर्च न करता भांबे गाव हे पूर्णपणे सिचिंत झालेले आहे. तशीच स्थिती प्रकल्पाच्या वरिल बाजूच्या जलाशयाजवळील (Upper Reservoir) गावांची आहे. वरिल गावातील ग्रामस्थांना भिती वाटते की त्यांना जे नैसर्गिक स्त्रोताव्दारे पाणी मिळते, ते या प्रकल्पामुळे बंद होईल का? कारण आपण धरण बांधल्यानंतर ते

नैसर्गिक झरे हे आपल्या धरणात येतील. म्हणजे त्यांना जे आतापर्यत पाणी मिळते, ते मिळणार नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या प्रकल्पामुळे त्यांना मिळणा-या नैसर्गिक जलस्त्रोतील पाण्यावर काहीही परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

९) **श्री संजय निकम, म्हारवंड, जिल्हा-साताराः-**

त्यांनी सांगितले की निवकणे गावात जे lower reservoir आहे, ते लघु पाटबंधारे विभागाकडे आहे. यासाठी ३०१ कुटुंबांनी जमिनी दिलेल्या आहेत. साधारणतः १५६ एकर जमिन अधिग्रहित करण्यात आलेली आहे. शासनाकडून आमच्या विस्थापनासाठी आम्हांला देय जमिन ही ३०० एकर आहे. मात्र या तिन्ही गावांसाठी ना पुनर्वसन, ना त्याबाबत काही प्रयत्न करण्यात आलेले आहेत. तसेच येथे जमीन अधिग्रहित करण्यात आलेल्या एकाही व्यक्तीला नोकरी मिळालेली नाही. तसेच वरिल गावातील ग्रामस्थांनी आपल्या जमीनी दिल्या, त्या खालील भाग सुपिक होण्यासाठी. त्यांनी जमीनी दिल्या, कारण ते पाणी फक्त शेतीसाठीच वापरले जाईल या अटीवर दिलेल्या आहेत. सादरीकरणात सांगण्यात आलेले आहे की ७.६२ एमसीएम धरणात पाणी आहे. आता ते धरण २५-३०% पूर्ण झालेले आहे. ते धरण पूर्ण झाले की त्याची क्षमता ही २८ एमसीएम म्हणजे १ टीएमसी पर्यत होईल.

येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की आपले मूळ प्लॅनबाबत जे काही प्रश्न,आक्षेप आहेत, ते आपण WRD - Water Resources Department कडे मागू शकता. आम्हाला त्यांच्याकडून विचारणा झाल्यानंतरच आम्ही मुळ योजना (original scheme) पूर्ण करु शकतो. ती आम्ही विना मोबदला (Free of Cost) शेतक-यांसाठी पूर्ण करण्यास तयार आहोत, ज्या शेतक-यांच्या जमिनी अधिगृहित करण्यात आल्या. आपण आपल्या सर्वच सूचना या WRD - Water Resources Department कडे मांडा, कारण आम्ही त्यांचा मूळ प्रकल्प राबवित नाही. तुमचे जे काही प्रश्न आमच्या अखत्यारित आहेत, ते आम्ही निश्चितच सोडवू.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की कुठलाही नवीन प्रकल्प असल्यास त्यात स्थानिकांच्या काही भावना असतात हे जिल्हा प्रशासन म्हणून आम्हांला कल्पना आहे. आपण जे वॉटर बॅलन्स केलेले आहे, ते पीएसपीचा initial fill हा २९.५७ एमसीएमचा आहे.

सिंचन घटकासाठी ७.६२ एमसीएमचा आहे. म्हणजे सुरुवातीची गरज ३७.१९ एमसीएम आहे. त्यात बाष्पीभवनामुळे पाण्याचे नुकसान धरले तर ते १.६० एमसीएम आहे. आपल्या म्हणण्यानुसार फक्त बाष्पीभवन, सरक्युलेशन लॉसेस हे २.० एमसीएमच्या आसपास होतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की येथे उपस्थित असलेले मुळतः हे प्रश्न विचारत आहेत की प्रस्तावित प्रकल्पामुळे येथील पाण्याचे स्त्रोत हे दुषित (contaminate) होतील का?त्याचबरोबर दुष्काळ असेल किंवा कमी पावसाची परिस्थिती असेल, त्यावेळी प्राधान्य कशास असेल? पीएसपीला असणार की लोकांच्या सिंचन योजनेला असणार आहे?

त्याचबरोबर पुनर्वसनाबाबत काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. प्रकल्पग्रस्तांचे असे म्हणणे आहे की त्यावेळी जमिनी दिल्या, त्या सिंचन प्रकल्पास देण्यात आल्या. अजूनही ७.६२ एमसीएम आहे. त्यालाच ते वचनबध्द आहेत. तरी उपस्थितांना सुचित करण्यात येते की आपल्या

ज्या काही प्रलंबित मागण्या आहेत, किंवा नविन मागण्या उपस्थित होत आहेत, जसे की जमिनी दिल्या त्याबदलात प्रकल्पात रोजगाराची संधी अजूनही देण्यात आलेली नाही. तर प्रकल्प प्रवर्तक सांगतात की, आपण या गोष्टी RD WRD - Water Resources Department कडे मांडा, कारण आम्ही त्यांचा मूळ प्रकल्प राबवित नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की हे सर्व मुद्दे बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येतील. येथील जनतेच्या भावना या WRD- Water Resources Department कडे या इतिवृत्ताची एक प्रत सादर करण्यात येईल. अध्यक्ष यांनी स्पष्टीकरण दिले की जे ७.६२ एमसीएम पाणी आहे, ते शेतीसाठीच वापरले जाणार आहे. त्यात कुठलाही बदल होणार नाही याची इतिवृत्तात नोंद घेण्यात आलेली आहे. तर त्याबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी पुनरुच्चार करावा.

अध्यक्ष यांनी पुढे मत मांडले की Over Period Of Time म्हणजे जसे पाणी रिफिंलींगला गेला, त्याबरोबर धरणातील लाईनिंग, वरिल स्टोरेजचे लाईनिंग व गळती (seepage) व धरणात जो गाळ भरत जाणार आहे, त्यामुळे काय परिस्थिती उद्भवणार आहे, हे सर्वांसमोर स्पष्टीकरण दिल्यास त्याबाबत पारदर्शकता येईल. तसेच लोकांच्या मनात कायमचा प्रश्न येत असतो ते पाण्याची गुणवत्ता. पीएसपी मुळे पाण्याचे तापमान, पाण्याची गुणवत्ता, व पाण्यातील नैसर्गिक घटक (Organism) यांत काही फरक पडेल का याबाबत विवेचन दिल्यास लोकांच्या मनातील शंका दूर होतील.

श्री संजय निकम, राहणार-म्हारवंड यांनी सांगितले की वरिल व खालील साठवण जलाशयाचा मुळ उद्देश शेती व पिण्याचे पाणी हा आहे, मात्र प्रकल्प प्रवर्तक पिण्याचे पाणी हे वीजनिर्मितीसाठी वापरणार आहेत. तसेच Upper Reservoir आणि Lower Reservoir आहेत, तेथे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक झरे आहेत. धरणाच्या खोदकामामुळे ते नष्ट होतील. त्यामुळे आमचे येथील नैसर्गिक संसाधने ही नष्ट होणार आहेत. त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांकडून पिण्याचा पाण्याचा प्रश्न हा सोडवलाच जाणार नाही. आपण फक्त ७.६२ एमसीएम पाणीच शेतीसाठी देत आहोत. तसेच Upper Reservoir हा जलसंपदा विभागांतर्गत येत नाही. तर आपण Upper Reservoir जवळ राहणा-या जनतेस पिण्यासाठी, शेतीसाठी पाणी कसे देणार? त्याचप्रमाणे Lower Reservoir जेथे आहे, तेथील हजारो एकर जमिनीस ते पाणी पुरेसे आहे काय? कारण मे महिन्यापर्यत पाणी लागते.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की आपण जे मुद्दे उपस्थित केले, त्यास लेखी स्पष्टीकरण देण्यात येईल. तसेच आपण उपस्थित केलेले सर्व मुद्द्यांची नोंद घेऊन जलसंपदा विभागास कळविण्यात येईल. पिण्याचे पाणी आम्ही प्रकल्पासाठी थांबविणार नाही.

श्री संजय निकम यांनी आक्षेप नोंदविला की प्रस्तावित प्रकल्पासाठी जे Upper Reservoir बांधण्यासाठी तेथे जी भिंत बांधत आहेत, तेथे प्रचंड प्रमाणात असणारे नैसर्गिक झरे हे नष्ट होणार आहेत.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी श्री संजय निकम व इतर उपस्थितांनी Upper Reservoir जेथे बांधण्यात येणार आहे, तेथे प्रचंड प्रमाणात असणारे नैसर्गिक झरे हे नष्ट होणार आहेत या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे जर पाणी

टंचाई झाली, तर पाण्याचे टँकर्स लागतील. शिवाय जे काही उपाययोजना करण्याचा खर्च प्रकल्प प्रवर्तकाने करावा.

त्यावेळी श्री संजय निकम व काही उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की आम्ही जे नैसर्गिक पाणी पित आहे, त्याऐवजी आम्ही टँकरने पुढील आयुष्यभर पाणी प्यावे काय? म्हणजे खालील बाजूकडील दुष्काळग्रस्त लोकांसारखी आमची अवस्था होईल. त्यावेळी अध्यक्ष यांनी स्पष्टीकरण दिले की जर नैसर्गिक झरे नष्ट होत असतील व त्यासाठी जे पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, जनावरांना पाणी लागेल त्याचा खर्च हा प्रकल्प प्रवर्तकांने करावा याबाबत विचार मी व्यक्त केलेला आहे.

श्री संजय निकम यांनी सांगितले की हा भाग भूकंपप्रवण क्षेत्रात येत असून येथे मोठ्या प्रमाणात भूस्खलन (land sliding) होत असते. २०१७ साली म्हारवंड व आरळ येथे भूस्खलन (land sliding) मोठ्या प्रमाणावर झाले. म्हारवंड गावाचे पुनर्वसन करण्याबाबत विधानसभेत चर्चा झालेली आहे. याचा कुठेही उल्लेख ईआयए अहवाल व सादरीकरणात नाही. शासनाने तेथील लोकांच्या पुनर्वसनासाठी २-२ १/२ कोटी रुपये खर्च केलेला आहे. त्यांनी तात्पुरत्या शेडमध्ये आश्रय घेतलेला आहे. तसेच प्रकल्पामुळे बाजूच्या दोन्ही डोंगरांवर परिणाम होणारच आहे. त्याबाबत अहवालात कुठेही उल्लेख नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या मुद्द्याची नोंद कंपनीसुध्दा घेईल. मात्र प्रकल्पाने Reservoir Protection Treatment Plan सादर केलेला आहे. तसेच भारत सरकारची CWPRS संस्था ही भूस्खलन (land sliding) बाबत जे निर्देश पारित करते, त्याची अंमलबजावणी करणे प्रकल्पास बंधनकारकच आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जगात भूकंप होणारच नाही याची कोणीही शाश्वती देऊ शकत नाही. मात्र भूकंप, भूस्खलन यावर त्यासाठी अगोदरच्या प्रतिबंधक उपाययोजना (prior preventive measures) भारत सरकारची CWPRS संस्था तसेच महाराष्ट्र शासनाची संस्था जे निर्देश पारित करतात, त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारकच आहे. त्यांनी श्री संजय निकम यांना सांगितले की आपणाकडे जो काही अहवाल असल्यास तो उपलब्ध करुन देण्यात यावा, त्याचा निश्चितपणे अभ्यास केला जाईल.

श्री संजय निकम यांनी सांगितले हा सर्व भाग भूस्खलनप्रवणच आहे. येथील माती नरम आहे. येथे पावसाचे प्रमाण हे ३,५०० मिलीमीटरपेक्षा जास्त आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आपण केलेला अभ्यास अहवाल उपलब्ध करण्यात यावा, त्याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

१०) <u>त्यावेळी श्री प्रदिप निकम, यांनी विचारणा केली</u> की मराठवाडी गावातील धरणाची जी जमिन आपण अधिग्रहित करणार आहात, तर तेथील नैसर्गिक स्त्रोतांचे जे गट नंबर उपस्थित श्री बाबूजी बोडके यांनी सांगितले, ते व सादरीकरणात दर्शविलेले गट नंबर दाखविण्यात यावेत.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांना, उपस्थितांना सूचना केली की आपणाकडे जे नैसर्गिक स्त्रोतांची माहिती आहे, त्याचे गट नंबर लेखीस्वरुपात जर प्रकल्प प्रवर्तकांना उपलब्ध करुन देण्यात आले, तर नैसर्गिक स्त्रोतांवर प्रस्तावित प्रकल्पाचा किती प्रमाणात प्रभाव (Impact) होईल, याबाबत प्रकल्प प्रवर्तकांकडून अहवाल प्राप्त करुन घेता येईल व तो बैठकीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येईल. किती स्त्रोत आहेत, धरणाच्या

भिंतीच्या आत ते जाणार आहेत काय, किती बारमाही स्त्रोत आहेत याची सर्व माहिती ही प्रकल्प प्रवर्तक यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

११) **एडव्होकेट सिध्देश पवार यांनी आक्षेप नोंदविला** की जर प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व हंगामात सर्वेक्षण केलेले आहे, तर त्यांना नैसर्गिक झरे का आढळले नाहीत? ईआयए अहवालात नैसर्गिक स्त्रोताबाबत काहीही माहिती देण्यात आलेली नाही. अहवालात त्यांनी त्रुटी ठेवलेली आहे.

अ) आयोजक यांनी सांगितले की आपण नैसर्गिक स्त्रोतांचे स्थान, गट नंबर उपलब्ध करुन द्यावेत, ते धरणात जाणार आहेत का, बाहेरिल स्त्रोतांचे धरणापासूनचे अंतर याबाबत प्रकल्प प्रवर्तकांना माहिती सादर करण्याची सूचना करण्यात येईल.

**ब) श्री भारत पाटणकरसर यांनी आक्षेप नोंदविला** की ब-याच गोष्टींचा उल्लेख अहवालात नाही. आरळ गावाचा पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला, त्यातील एकाही माणसाचे पुनर्वसन झालेले नाही. त्यास विद्यमान प्रकल्प प्रवर्तक जरी प्रत्यक्ष जबाबदार नसले तरीपण तो तुमच्या उपक्रमाशी संबंधित आहे. कारण शासनाने आपणास धरणाची उंची वाढविण्याची सूचना केली व आपण ती मान्य केली. धरणाची उंची वाढली म्हणजे अधिक जमिन ओलिताखाली येणार. त्यामुळे जी जमिन आता ओलिताखाली येत नाही, तेथे आताही काहीही करता येणार नाही. त्यामुळे प्रकल्प प्रवर्तक, स्थानिक लोक व WRD विभाग, पुणे यांची संयुक्त बैठक पूर्वसूचना देऊनच आयोजित करण्यात यावी. आरळ निवकणे धरणाचा साठा तुम्हांला परस्पर देतील व आपण म्हणाल की आमचा काहीही संबंध नाही. तर तसे चालणार नाही.

ब) दुसरा मुद्दा येथे भूस्खलनचा (land slide) उल्लेख झाला. तरी येथे बोगदा खणणे धोकादायक नाही, यासाठी सह्याद्रीचा पर्यावरणीय अभ्यास केलेल्या संस्थेकडून पारित केलेले ना हरकत प्रमाणपत्र आम्हांला आपल्याकडून हवे आहे.

क) कारण ज्यावेळी भूस्खलन झाले, त्यावेळी एक भूगर्भशास्त्रज्ञ (Geologist) व आम्ही स्थानिक लोक संपूर्ण भूस्खलन झालेले क्षेत्र कोयनानगर पर्यत फिरलेलो आहोत. तर येथे स्पष्ट झालेले आहे की येथील जी मृदा/माती आहे आणि त्यावरिल जे fractured rock आहे, त्याचे मातीमध्ये परिवर्तन होते आणि त्यामुळे येथे बोगदा केल्यास ते धोक्याचे होईल, आणि जर ब्लास्टिंग केले तर त्यामुळे अजूनही परत भूस्खलन (land slide) सुरु होईल. तसा अहवाल उपलब्ध आहे.

ड) तरी कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महांमडळाच्या बैठकीस भूगर्भशास्त्रज्ञच (Geologist) बोलाविले पाहिजेत. त्याचप्रमाणे पर्यावरणवादीसुध्दा बोलवावेत. स्थानिक भाषेत आडव्या पाटाची धरणे असे म्हटले जाते. ते आमच्या वाडवडिलांनी केलेले आहे. त्याविषयी प्रकल्प प्रवर्तक काहीही बोलणार नाही असे सांगितले. तर हे वडिलोपार्जित नैसर्गिक प्रवाह आहेत, त्यांना आडव्या पाटाची धरणे म्हणतात, ते सुरक्षित राखणे तसेच प्रवाह चालू राहणे आवश्यक आहेत, त्याची काळजी घेतली पाहिजे.

इ) पुढील मुद्दा - हा वन्यजीवांचा (wild animals) कॉरिडॉर असून प्रस्तावित प्रकल्पापासून काही मीटर अंतरावरच आहे. येथील कुठल्याही गावातील लोक सांगतील की बिबटे, अस्वले, गवे येथे फिरताना दिसतात. प्रकल्प स्थापनेसाठी यंत्रांची सुरुवात झाली की आवाजाने ते वरुन खालील गावात फिरताना दिसतील. तरी त्या कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महांमडळाच्या

बैठकीस वनविभागाच्या वरिष्ठ अधिका-यास बोलाविण्यात यावे. वनविभागाने परवानगी कशी दिली हा आमचा प्रश्न आहे.

ई) वरच्या जंगलात राहणारे वन्य प्राणी हे तेथे त्यांना हवे असे रहिवास (habitat) नाही, म्हणूनच खाली येतात. कारण वनविभागाच्या कंत्राटदारांनी जंगलातील झाडे तोडलेली असून तराफाने ती वाहून नेलेली आहेत. मात्र वनविभाग आमच्या गावात येऊन झाडे लावा, झाडे जगवा अशी हाकाटी देते. तरी पर्यावरण (Environment); Ecology (पर्यावरणशास्त्र); Geology (भूशास्त्र), zoology (प्राणीशास्त्र) यांचा समावेश असणारी समिती ही गठित करण्यात यावी.

उ) जे विषय तेथे येथील, तेथे आम्ही बोलू. आपल्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणात असे सांगितलेले आहे की कुठलाही प्रकल्प असो, खाजगी असो, सरकारी असो, त्या प्रकल्पाबाबत प्रश्न् विचारण्याचा अधिकार जनतेस शेड्युल १ मध्ये दिलेला आहे. त्यात उल्लेख आहे की एखाद्या प्रकल्पासाठी जर लोक बाधित होत असतील, तर राष्ट्रीय पुनर्वसन धोरणात प्रकल्प बाधितांची संख्या ही कमी प्रमाणात असण्याचे निर्देश दिलेले आहेत.

श्री भारत पाटणकरसर यांनी सांगितले की आम्ही या जिल्ह्यातील रहिवाशी असून परागंदा होण्याची वेळ आमच्यावर आलेली आहे.

प्रकल्प उत्पादन प्रक्रिया सुरु झाली की वरच्या बाजूचे सर्व वन्यजीव खाली गावात येऊन फिरणार आहेत.

ऊ) सर्व प्रकल्पांना पर्याय देणे आवश्यक आहे.

ए) जर आपला खाजगी प्रकल्प आहे, तर त्याची सर्व माहिती आम्हांला उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच प्रकल्पस्थानापासून खालच्या सर्व गावात धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्तच आहेत. या पाटण तालुक्यात बरेच धरणे आहेत, मात्र एकाही धरणग्रस्ताचे पुनर्वसन झालेले नाही.

अं) प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहित करण्यात आली किंवा विकत घेण्यात आली, तरीही पुनर्वसन कायदा लागू आहे. २५० हेक्टर जमीन बाधित झालेली असेल, तर पुनर्वसन कायदा लागू होतो.

अम) तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी या प्रकल्पास काही पर्याय आम्हा ग्रामस्थांना विचारण्यात यावेत. आम्ही ते निश्चितच देऊ.

अअ) शिराळपेठेत मंडू हे गांव आहे. तेथे रोज माणसे मरत आहेत. जर जनावरे खाली आली, तर येथील गावात तीच स्थिती होईल.

**<u>१२) श्री बाबुजी बोडके, जवरातवाडी तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-</u>**

श्री बाबुजी बोडके यांनी सांगितले की १५७ शेतक-यांनी १९९९-२०१० पर्यंत जलसंपदा विभागास जमीन दिलेली होती. आजपावेतो त्यांचे पुनर्वसन झालेले नाही. तसेच आता आपल्या प्रकल्पास आमची जमीन गेल्यानंतर आमच्या येथील शेतकरी हे अल्पभूधारक होणार आहेत. तसेच आता विषय होतो पुनर्वसन कोण करणार, शासन करणार का कंपनी करणार. जे जमिन अधिग्रहण १९९९-२०१० साली शासनाकडून केले गेले, त्यावेळी काही शेतकरी उदरनिर्वाहासाठी परगावी असल्याने शासनाने त्यांचे जमिन अधिग्रहण केले नाही. त्यामुळे त्यांची जमिन त्याच गट नंबरमध्ये त्याच जागेवर राहिली. आता नविन जागी त्यांनाही जमीन उपलब्ध करुन देण्यात यावी. कारण तेसुध्दा आमच्या बरोबर अल्पभूधारक शेतकरी होणार आहेत. तरी शासन आणि कंपनी यांनी सामंजस्याने त्यांनाही त्याप्रमाणे लाभ देण्यात यावा. कारण पुनर्वसन होत नाही.

त्यामुळे आमची जमिन ही शासनाने घेतली पाहिजे किंवा कंपनीने आमची जबाबदारी घेतली पाहिजे. जवरातवाडीचे सर्व शेतकरी हे अल्पभूधारक होणार आहेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले जे पहिले पुनर्वसन झालेले नाही, त्याबाबत शासनाकडे आपण पाठपुरावा करण्यात येईल. तसेच शासन व कंपनीच्या बैठकीच्या वेळी आपणासही बोलाविण्यात येईल.

त्यावेळी एका उपस्थितानी मत मांडले की जोपर्यंत वरिल दोन मुद्द्यांवर सकारात्मक निर्णय होत नाही, तोपर्यत कंपनीची इतर कामे ही स्थगित ठेवण्यात यावी.

१३) श्री भरत जोरे, राहणार-जवरातवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-

जे मुद्दे उपस्थित केले, त्याचा सबळ पाठपुरावा होत नाही. तर त्याबाबत पाठपुरावा करुन त्याबाबत तोडगा काढल्यानंतरच पुढील प्रक्रिया हाती घेण्यात यावी. सादरीकरणात पुनर्वसन स्लाईडवर काहीही लिहिलेले नाही. म्हणजे कंपनीने पुनर्वसनाची दखलच घेतलेली नाही. तसेच शासनास विनंती आहे की जोपर्यंत सर्व कागदपत्रे, वारसदाराच्या नोंदी घेतल्याशिवाय पुढील कार्यवाही करु नये. कुठलाच दस्तावेज हा कंपनीच्या नावाने होऊ नये. मग ते साठेखत, कुलमुखत्यार असले तरी जोपर्यत शासन व अदानी कंपनी यावर तोडगा काढत नाही, तोपर्यत करु नये. पवनचक्की प्रकल्पात आमचे पूर्वज हे फसलेले आहेत.

१४) श्री बाबुजी बोडके, जावळी तालुका, जिल्हा-साताराः-

कंपनीने बाहेरच्या एजंटकडून जमिन खरेदी करण्याऐवजी स्थानिक शेतक-यांशीच प्रत्यक्ष चर्चा करावी. कोणताही मध्यस्थ नको. प्रत्यक्ष शेतक-याकडूनच खरेदी करण्यात यावी.

यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपण केलेल्या सूचना अतिशय योग्य असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. कंपनी व्यवस्थापन पारदर्शक व्यवहार करणार आहेत.

१५) येथे श्री भरत जोरे यांनी मागणी केली की तोपर्यत येथे पुढील विकासाचे काम करण्यात येऊ नये. तसेच कंपनीने व शासनाने आम्हांला पूर्वसूचना देऊन कालावधी द्यावा आमची खरेदी करण्यासाठी. तसेच येथे खातेफोडसुध्दा ब-याच प्रमाणात आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कोणावरही अन्याय होऊन देणार नाही. तसेच पुनर्वसन हे शासनाबरोबरच करावे लागेल. त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. त्यावेळी श्री भरत जोरे यांनी सांगितले की गट नं. ९४, १०३, ९२, ९५, तर जे देतात, त्यांच्याकडूनच घेण्यात यावी. जे देत नाहीत, त्यांच्यावर बळजबरी करण्यात येऊ नये.

प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की सर्वांनाच योग्य भाव देण्यात येणार आहे. त्यावेळी श्री भरत जोरे व इतर उपस्थित यांनी मागणी केली की योग्य भाव म्हणजे कंपनीने आम्हा शेतक-यांबरोबर समोरासमोर बसूनच चर्चा केली पाहिजे.

यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की ही बैठक प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक बैठक आहे. तरी पर्यावरणविषयकच सूचना, आक्षेप हे उपस्थित करण्यात यावेत.

१६) श्री शरद यादव, गाव-मराठवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-

येथे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी एकत्रित आलेलो आहोत. मुद्दे नविन नविन येत राहणार. आम्ही १०-१२ कि.मी. अंतरावरुन आलेलो आहोत, तर काही उपस्थित हे

त्यापेक्षा लांबून आलेले आहेत. तरी स्थानिकांचा विचार येथे करण्यात यावा, त्यास आपला पाठिंबा हवा.

प्रश्न १- प्रकल्प प्रवर्तक जे पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी देणार आहात, तर त्याचा खर्च कंपनी स्वतः करणार आहे की शेतक-यांकडून घेणार आहे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी ही WRD ची असते. आम्हांलाही ते WRD लाच द्यावे लागते.

मात्र पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची कंपनीने जबाबदारी घेतलेली असून कंपनी ती तंतोतंत पाळेल.

श्री शरद यादव यांनी मागणी केली की कंपनीने ते आश्वासन लेखी स्वरुपात द्यावे. कंपनी अधिकारी जेव्हा गावात येतील, त्यावेळी त्यांनी लेखी स्वरुपात तो मुद्दा स्थानिकांना द्यावा.

त्यांनी कंपनीने जमिन खरेदीसाठी नेमलेली माणसे शेतक-यांना मोबदला देताना कशासाठी व कशाप्रकारे खर्च करणार आहेत याची माहिती दिली. तसेच ते पैसे शेतक-यांना दिलेल्या पैशातून वजा होत असतील, तर ते शेतक-याचे नुकसानच आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही असे अंदाजपत्रक कुणालाही दिलेले नाही.

त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी फक्त पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून फक्त पर्यावरणविषयकच सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की तुमच्या मुद्दयाची नोंद घेण्यात आलेली आहे. बैठकीतील चर्चेनुसार परत सर्व स्लाईड्स दर्शविण्यात येतील. नंतर तुम्हांला बोलण्याची संधि देण्यात येईल.

१७) <u>श्री कृष्णात यादवः-</u>

आमची सुमारे २६१ एकर जमिन किंबहुना त्याहून जास्त शेतीची जमिन या प्रकल्पात अधिग्रहित करण्यात येणार आहे. आम्ही शेकडो वर्षे जतन केलेली मोठ्या प्रमाणात झाडी आहेत. वनस्पती, पालेभाज्या आहेत. अनेक प्रकारची फळझाडे तोरण, करवंदे, अगदी रानमेवा म्हणतो ते सर्व आहे. त्यामुळे पावसाळ्यातसुध्दा मोठ्या प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी आमच्या गावात येतात. त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळतो. प्रत्येक कुटुंबात गाई-म्हशी पाळत असल्याने दुग्धव्यवसायही मोठ्या प्रमाणात चालत असतो. आमच्या जवरातवाडी व मराठवाडी गावातील सुमारे ५०० कुटुंबे ही कमीतकमी १५,००० रुपये या पाण्यामुळे आणि शेतीमुळे कमवत आहेत. एवढ्या चांगल्या प्रमाणात आम्हांला उत्पन्न मिळत असेल, तर या प्रकल्पाची आम्हांला गरजच नाही. हा प्रकल्प आमच्यावर जबरदस्तीने लादण्यात येऊ नये. जर शासनाने मध्यस्थी करुन आमच्यावर प्रकल्प लादला तर आम्ही आत्मदहनसुध्दा करु, पण हा प्रकल्प येथे होऊ देणार नाही.

१८) <u>श्री मारुती पवार, राहणार-भारसाखळे, जिल्हा-सातारा:-</u>

उपस्थितांनी बरेच मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यात भारसाखळे गावाचाही उल्लेख झालेला आहे. या प्रकल्पामुळे भारसाखळे गावाची ९०-९५% टक्के जमिन अधिग्रहित करण्यात येणार आहे. आता पर्यावरणाचा विषय. प्रकल्प प्रवर्तक रिव्हर्स पपिंग स्टेशन करणार आहेत. ते भूगर्भात होणार आहे. ज्यावेळी दोन वर्षांपूर्वी जी भूस्खलन (land slide) झालेले होते, त्यावेळी

आमचा रस्ता जवळजवळ सहा महिने दळणवळणासाठी बंद होता. जर पुन्हा भूस्खलन (land slide) झाले तर आमचा रस्ता हा दळणवळणासाठी परत बंद होईल. तर त्यासाठी काय पर्याय आहे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की कुठलीही परवानगी जेव्हा शासन प्रदान करते, तेव्हा तेथील सर्व परिस्थिती म्हणजे तेथील भूगर्भ शास्त्राचा (Geology) अभ्यास करुनच परवानगी देत असते. जेव्हा जमीनीच्या आत काम चालू असते, त्याचा परिणाम हा जमिनीवर बाहेर होत नाही.

त्यावेळी श्री मारुती पवार भारसाखळे यांनी आक्षेप नोंदविला की पावसाळ्यात जेव्हा भूस्खलन (land slide) होत्ते, तेव्हा संपूर्ण डोंगर खाली येतो. म्हणजे आपल्या भूगर्भातील कामाचा जमिनीवर परिणाम होणार. आपल्या भूगर्भातील कामामुळे येथे भूस्खलन (land slide) ही होणारच. ती होणार नाही, याची आपण हमी देऊ शकता काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हमी (guarantee) देता येईल. कारण आमची कंपनी ही हिमालयातही टनेलिंग करते. सर्व काळजी ही घेण्यात येतच असते. त्याशिवाय प्रत्येक गोष्टींसाठी वेगवेगळी सोल्युशन्स आहेत.

श्री मारुती पवार भारसाखळे यांनी सांगितले की जोपर्यत आपणाकडून हमी मिळत नाही, तोपर्यत या प्रकल्पास आमचा विरोधच असेल.

दुसरा प्रश्न.- येथे उपस्थितांनी पाण्याच प्रश्न उपस्थित केलेला आहे. आमच्या येथे असणारे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत, झरे प्रकल्पाच्या बांधणीमुळे नष्ट होणार आहेत. त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले याबाबत अगोदर चर्चा झालेली आहे. तरी आपण लेखी स्वरुपात गट नंबरसह माहिती प्रकल्प प्रवर्तकांना सादर करावीत. त्यांच्याकडून लेखी उत्तर घेण्यात येईल व ते शासनास सादर करण्यात येईल.

१९) <u>श्री बाळासाहेब सपकाळ, राहणार-सावरघर, जिल्हा-सातारा:-</u>

प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची जाहिरात एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्रात दिनांक १७ जानेवारी, २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रभावित होणा-या १० कि.मी. त्रिज्येतील गावांचा उल्लेख आहे. तर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक ही जवरातवाडी येथे आयोजित करण्यात आलेली आहे. मात्र प्रकल्प प्रभावित गावात जवरातवाडी येत नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की अप्पर रिझरव्हायर (Upper Reservoir) व लोअर रिझॉरव्हायर (Lower Reservoir) येथील दोन्ही गावे बाधित होत आहेत. त्या दोन्हीच्या मध्यावर असलेले जवरातवाडी हे गाव असल्याने ही बैठक जवरातवाडी येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

श्री बाळासाहेब सपकाळ यांनी आक्षेप नोंदविला की लोकांना जाण्या-येण्याची सोय पाहिली तर खालील निवकणे गावांतर्गत या सर्व वाड्या येतात. ही जनसुनावणी निवकणे गावात असती तर सर्वांना योग्य झाले असते. तरी जवरातवाडी जनसुनावणी स्थानास माझी हरकत आहे.

त्यानंतर पर्यावरणविषयक जनसुनावणीच्या वृत्तपत्रातील जाहिर सूचनेत उल्लेख आहे की सर्व ग्रामपंचायत कार्यालयात प्रस्तावित प्रकल्पाचा संपुर्ण दस्तावेज उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यावेळी आयोजक यांनी स्पष्टीकरण दिले की गावांची संख्या जास्त असल्याने काही

गावांमध्ये तो दस्तावेज उशिरा पोचला . स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयात त्याबाबत लेखी रिसिट्स उपलब्ध असून ते उपलब्ध करण्यात येतील.

श्री बाळासाहेब सपकाळ यांनी मागणी केली की ब-याच लोकांना हा दस्तावेज अभ्यासण्यास वेळ कमी मिळाला. तरी या बैठकीनंतर प्रकल्प प्रभावित गावातील जनतेस लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी किमान पंधरा दिवसांचा कालावधी देण्यात यावा.

आयोजक यांनी सांगितले मा. अध्यक्ष यांनी लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्यास दोन दिवस दिलेले आहेत. तर आपण दोन दिवसात आपल्या सूचना,आक्षेप नोंदवू शकतात. तसेच प्रकल्पाचा दस्तावेज सातारा येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहे. तेथे आपण अभ्यास करुन सूचना, आक्षेप नोंदवू शकता. ते शासनास सादर करण्यात येतील.

२०) **श्री भारत पाटणकरसर यांनी आक्षेप नोंदविला** की या एवढ्या मोठा विषयावर आम्ही दोन दिवसात अभ्यास करुन आपणास सूचना, आक्षेप नोंदवू शकतो का? आपण पंधरा दिवसांची मुदत वाढवून द्यावी.

चर्चेनंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सोमवार, २३ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत आपण आपले आक्षेप नोंदवू शकता.

२१) **श्री संजय निकम, म्हारवंड, जिल्हा-सातारा यांनी** माहिती दिली की दोन वेळा या प्रकल्पाचा प्रस्ताव बदलण्यात आलेला आहे. २०२३ ला बदलला व नंतर २०२५ ला बदलला. २४५० मेगावॅटचा २७०० मेगावॅट उत्पादनाचा प्रकल्प तयार केला.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पासाठी पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे प्राथमिक मान्यता (टीओआर) प्राप्त करण्यासाठी अर्ज करावा लागतो. टीओआर प्राप्त झाल्यानंतरच प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात पर्यावरण सर्वेक्षण करुन ईआयए अहवाल तयार करणे जनसुनावणी अगोदर करणे बंधनकारक आहे. प्रकल्प प्रवर्तकांना टीओआर मंजूर झाल्यानंतर व प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात पर्यावरण सर्वेक्षण करुन ईआयए अहवाल तयार झाल्यानंतर प्रकल्प प्रवर्तकांनी मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज सादर केल्यानंतर ईआयए अधिसूचना, २००६ नूसार ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

२२) **श्री संजय निकम, म्हारवंड, जिल्हा-सातारा यांनी** आक्षेप नोंदविला की निवकणे येथील महसून क्षेत्र आहे, त्यातील १,१०० एकरवर पवनचक्कीचा प्रकल्प आहे. आता ९०० एकर जागा निवकणे एकात्मिक पीएसपी साठी घेण्यात येत आहे. म्हणजे २,००० एकर जमिन एकाच महसूल क्षेत्रातून घेतली जात आहे. म्हणजे येथील मुळ जनतेवर अन्याय होत आहे. तर या प्रकल्पासाठी फक्त निवकणे हे एकच महसूल क्षेत्र आहे काय?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित मुद्द्याची नोंद घेतल्याचे सांगितले. ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून त्याबाबतच सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत.

श्री भारत पाटणकरसरांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की बैठकीच्या सुरवातीस आपण सांगितले की उपस्थितांच्या इतर विषयावरिल सुचनांची नोंद घेण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की या बैठकीचा मुळ विषय प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा आहे. त्यामुळे मुख्य विषय पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविणे योग्य होईल. मात्र इतर विषयांची नोंद घेण्यात येत आहे.

श्री संजय निकम यांनी आक्षेप नोंदविला की प्रस्तावित प्रकल्प हा "पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (Eco-Sensitive Zone)" येत आहे. संपुर्ण निवकणे गाव हे प्रकल्प पर्यावण संवेदनशील क्षेत्रात (Eco-Sensitive Zone) येत आहे. येथील सर्व वाड्यावस्त्या या "पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (Eco-Sensitive Zone)" क्षेत्रात मोडत आहेत. ही जनसुनावणीची जागा १,००० मीटर उंचीवर आहे. येथून ०.५ कि.मी. अंतरावर "सह्याद्री व्याघ्र प्रकल्प" आहे. धरणाची उंची, भरणक्षमता वाढली, त्यामुळे म्हणजे ५० मीटर अंतरावर आता "सह्याद्री व्याघ्र प्रकल्प" आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ज्यावेळी हा प्रस्ताव Expert Appraisal Committee समोर गेला असेल, त्यावेळी त्यांनी आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर निश्चितपणे विचार केलेला असेल. मात्र जनसुनावणीत उपस्थित करण्यात आलेल्या "पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत (Eco-Sensitive Zone)" मुद्द्याची नोंद तेथील तज्ज्ञ समिती छाननी करताना घेईलच. तसेच भारसाखळे गावातील केरा नदीच्या पलिकडील भाग हा नविन महाबळेश्वर क्षेत्रात येतो. नविन महाबळेश्वर नियमावली येथे लागू करण्यात आलेली आहे काय?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की नविन महाबळेश्वर क्षेत्राची Planning Authority ही एमएसआरडीसी आहे. त्याअनुषंगाने डी.सी. रुलप्रमाणे आपण केलेल्या उपस्थित मुद्द्यांवर निश्चितपणे विचार होईल. ही बाब आपण नविन महाबळेश्वर क्षेत्राची Planning Authority ही एमएसआरडीसी असल्याने त्यांच्या निर्दशनास व पुढीर कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्याबाबत पुढील निर्णय MSRDC देईल.

२३) <u>श्री चैतन्य हरिषचंद्र दळवी, राहणार-जुनगती, जिल्हा-सातारा:-</u>

ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. माझा पहिला प्रश्न आहे-

अ) हा निवकणे प्रकल्प कृष्णा खोरे महामंडळाच्या ताब्यात आहे. हा प्रकल्प हस्तांतरित झालेला नसतानाही ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी कशी आयोजित करण्यात आली? ही जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे.कारण पाटबंधारे विभागाने हा प्रकल्प अदानी ग्रीन एनर्जीला आज रोजीपर्यत हस्तांतरित केलेलाच नाही. केला असेल तर त्याचा खुलासा करण्यात यावा. याचे उत्तर प्रथम कंपनीने द्यावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की WRD ने नियमानुसार MoU करुन अदानीला अभ्यासासाठी दिला आहे. त्यावेळी अनेक उपस्थितांनी अभ्यासासाठी नाही. आपणास हस्तांतरित केलेला आहे का याबाबत विचारणा केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्प प्रवर्तक अदानी ग्रीन एनर्जीने महाराष्ट्र शासनाबरोबर MoU केलेला आहे. त्यावेळी उपस्थितांनी MoU झाला असल्यास तो स्क्रीनवर दाखविण्यात यावा अशी मागणी केली.

त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की अदानी कार्यालयात सर्व कागदपत्रे तपासू शकतात.

२४)त्यावेळी सुरज विनायक पाटणकर, ग्रामस्थ-निवकणे,अध्यक्ष, मंदुरे विकास सेवा सोसायटी-

जर शासनाने अदानी ग्रीन एनर्जी बरोबर जर MoU केलेला असेल तर तो कोणत्या नियमावर हस्तांतरित केला याचा खुलासा करण्यात यावा. मी यायच्या आधी काही मुद्दे झाले असतील. निवकणे आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांतर्फे मी माझे म्हणणे मांडत आहे. जर कृष्णा खोरेने सदरहू प्रकल्प अदानी ग्रीन एनर्जीला हस्तांतरित केलेला आहे, तर कृष्णा खोरे आणि महाराष्ट्र शासन यांचे प्रकल्पग्रस्त, बाधित शेतकरी यांच्याशी काही संपर्क चर्चा झालेली आहे काय? तर MoU मध्ये ज्या काही अटी व शर्ती आहेत, त्या सर्वांसमोर दाखविण्यात याव्यात.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केले की ही जनसुनावणी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. पर्यावरण अनुमती (ईसी) प्राप्त करण्यासाठी आहे. संबंधित कंपनीच्या MoU मध्ये ज्या काही अटी व शर्तीबाबत आपण लेखी निवेदन दिल्यास प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेले लेखी उत्तर शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. आपण एम.ओ.यु. झालेलाच नाही या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच आपण प्रकल्प प्रवर्तकांच्या कार्यालयात जाऊन MoU तपासू शकता, त्यातील अटी व शर्ती तपासून लेखी आक्षेप नोंदवू शकता, ते शासनास सादर करण्यात येतील. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सातारा कार्यालयात जाऊन त्यांना कंपनीने सादर केलेली कागदपत्रे तपासू शकता. मी अध्यक्ष म्हणून सांगतो की सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात येत आहे. या बैठकीचा मुळ उद्देशच आपण उपस्थित केलेल्या सूचना, विचार,टीकाटिप्पणी, आक्षेप यांची नोंद घेणे व शासनास सादर करणे हाच आहे.

२५)श्री चैतन्य हरिषचंद्र दळवी, राहणार-जुनगती, जिल्हा-साताराः-

मी परत आक्षेप नोंदवितो की निवकणे गावातच प्रकल्प होणार आहे. जर निवकणेने जर सदरहू प्रकल्प अदानीला हस्तांतरित केले नसेल, तर ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे.

दुसरा मुद्दा- आधी पुनर्वसन, मगच धरण. याला १५७ लोक पात्र आहेत. मात्र बाकी जी ३०० लोक आहेत, त्यांनी निवकणे प्रकल्पासाठी जमिन दिलेली आहे. त्यांच्या पुनर्वसनाबाबत काहीही धोरण ठरत नाही. मग बेकायदेशीरपणे अदानीला कसे हस्तांतरित करण्यात येते?

पुढील मुद्दा - आरळ म्हणून एक गाव आहे,त्या गावाची वसाहत आहे, ते त्यांना माहितच नाही. ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे. कारण ज्यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात सदरहू प्रकल्पाविषयी दस्तावेज उपलब्ध करण्यात आला, त्यावेळी ग्रामपंचायतीची निवडणूक आचारसंहिता होती. त्यामुळे स्थानिक लोक ग्रामपंचायत कार्यालयात गेलेच नाही. गावात दवंडी सुध्दा दिली नाही. म्हणून आज आमच्या हरकती नोंदवाव्यात, परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. य़ेथे आपण स्विकारलेले आहे की चार गावे प्रभावित होणार आहेत, तर त्यांना आवश्यक असणा-या नागरी सुविधांची जबाबदारी कोण घेणार आहे? तसेच हे भूकंपप्रवण क्षेत्र

आहे. भूस्खलन होण्याची येथे जास्तप्रमाणात शक्यता आहे. प्रकल्पासाठी बोगदे खणल्याने येथील नैसर्गिक स्त्रोत हे नष्ट होणारच आहेत.

तसेच येथे अदानी कंपनीचे सक्षम अधिकारी (Authorized Dignitaries) आहेत काय? पर्यावरणाच्या नावाखाली येथील गरिब शेतक-यांची दिशाभूल करण्यात येत आहे, आचारसंहितेच्या काळात ग्रामपंचायतीत जनसुनावणी नोटीस लावतात. तरी ही बैठक रद्द करुन नविन जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी.

**त्यावेळी सुरज विनायक पाटणकर, ग्रामस्थ-निवकणे,अध्यक्ष, मंदुरे विकास सेवा सोसायटी यांनी एम.ओ.यू. स्क्रीनवर दाखविण्याची** परत मागणी केली.

२६)<u>श्री जोतिबा रामचंद्र बावधणे, सरपंच, ग्रामपंचायत, निवकणे, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा:-</u>

दोन महिन्यापूर्वी सातारा जिल्हा परिषद कार्यालयात पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात आलेली होती. संबंधित प्रकल्प हा अदानी कंपनीस हस्तांतरित करण्यात आला होता का याबाबत मी स्वतः प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यावेळी कार्यकारी अभियंता श्री शिंदे, जलसंधारण विभाग यांनी उत्तर दिले की अद्यापपावेतो संबंधित प्रकल्प हा अदानी प्रकल्पास हस्तांतरित झालेलाच नाही, मात्र चर्चा चालू आहे. धरणग्रस्तांचे प्रश्न अजूनही शासनाकडून मार्गी लागलेले नाहीत. त्यावेळी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लागलेले नाहित,तोपर्यत हा प्रकल्प अदानीस हस्तांतरित करण्यात येणार नाही असे स्थानिक शेतक-यांना सांगण्यात आलेले आहे.

बैठकीत आरळ गावाचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. तेथे गुरे फिरण्यासाठी जागा नाही. तेथे काम सुरु झाले तर आरळ ग्रामस्थांना राहता येणारच नाही. तरी स्थानिक जलसंधारण विभागाने जर हस्तांतरित केला तर कोणत्या अटी व शर्तीवर केला. त्या अटी व शर्ती येथे जाहिर करण्यात याव्यात. नंतरच प्रकल्पाची जनसुनावणी जाहिर करावी. त्या बैठकीत शासनाच्या संबंधित सर्व विभागाचे अधिकारी म्हणजे जलसंधारण, कृष्णा खोरे, वनविभाग, पुनर्वसन, महसूल, पर्यावरण, पाटणचे प्रांताधिकारी, तहसीलदार तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे अधिकारी हे उपस्थित राहिले पाहिजेत.

तसेच निवकणे ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास ही जनसुनावणी परत आयोजित करण्याची विनंती करण्यात आलेली होती. सर्व ग्रामस्थांच्या सहीने हे निवेदन देण्यात आलेले होते. येथे ग्रामदेवतेचा कार्यक्रम होता, त्यामुळे बरेच ग्रामस्थ येऊ शकलेले नाहीत.

तरी सर्व विभागांनी कागदपत्र आणून बैठक लावण्यात यावी. अन्यथा, आम्ही या बैठकीवर बहिष्कार टाकतो.

२७)<u>एक उपस्थित नांव सांगितले नाही</u>

आमची सामान्य माणसांची विनंती आहे की आमच्या निवकणे गावातील शासकीय कर्मचा-याने आमची जमिनीवर दुस-याचे नाव टाकलेले आहे. प्रांतसाहेबांकडे आमची तक्रार चालू आहे. अदानीच्या एजंटने माझे समोरचे घर घेतलेले आहे. तर माझी जमिन मला परत देण्यात यावी.

सरपंच, निवकणे यांनी ही जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केली, अन्यथा आम्हांला या जनसुनावणीवर बहिष्कार टाकावा लागेल.

त्यावेळी बरेच लोक समुहाने आजची बेकायदेशीर जनसुनावणी रद्द करण्याची मागणी करत होते.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून पर्यावरण अनुमतीसाठी आहे. पर्यावरण अनुमती मिळाली म्हणजे प्रकल्पास मंजूरी मिळाली असे नाही. तरी सर्वांनी शांत बसून प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप उपस्थित करण्यात यावेत.

२८)**त्यावेळी सुरज विनायक पाटणकर, ग्रामस्थ-निवकणे,अध्यक्ष, मंदुरे विकास सेवा सोसायटी यांनी एम.ओ.यू. स्क्रीनवर दाखविण्याची** परत मागणी केली. त्यांनी संबंधित अधिका-यांनी त्यांची ओळख देण्याची सूचना केली.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की MoU आपणास पाठविण्यात येईल.

त्यावेळी **सुरज विनायक पाटणकर यांनी सुनावणी रद्द करण्याची मागणी केली, कारण ग्रामस्थ म्हणून आमचा अधिकार आहे** MoU पाहण्याचा.

आयोजक यांनी सांगितले की ग्रामपंचायत कार्यालयात दस्तावेज उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यावेळी **सुरज विनायक पाटणकर यांनी** उडवाउडवीची उत्तरे देऊ नये अशी मागणी केली.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाने जो Memorandum of Understanding केलेला आहे, तो ०३-०९-२०२४ चा आहे. त्यात निवकणे प्रकल्पाचा उल्लेख आहे आणि Memorandum of Understanding मध्ये असेही म्हटलेले आहे की On receipt of Application from AGL म्हणजे Adani Green Limited for water allocation GOM-WRD will facilitate process of water allocation for the project for one time initial filling as well as annual consumption for the requirement.या पध्दतीचा Memorandum of Understanding महाराष्ट्र शासनाने एजीएल बरोबर केलेला आहे.

याबाबत आपले काही आक्षेप असतील तर ते GOM-WRD पाठवून देऊ. हा सर्व दस्तावेज ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते. त्याचे अवलोकन करणे आवश्यक होते. उपस्थितांना दस्तावेज ग्रामपंचायत कार्यालयातून मिळालाच नाही असे सांगितले. त्यावेळी अध्यक्ष यांनी आताही तो पत्रव्यवहार आपणास दाखविण्यात येतील असे सांगितले.

२९)श्री जोतिबा रामचंद्र बावधणे, सरपंच, ग्रामपंचायत, निवकणे, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा:-

यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की हा २०२४ चा पत्रव्यवहार आहे. संबंधित निवकणे प्रकल्प हस्तांतरित करताना घातलेल्या अटी व शर्ती, किती बजेटला केला, सामान्य शेतकरी, प्रकल्पग्रस्त यांचे प्रश्न कशाप्रकारे सोडविणार आहेत, याचा कुठेही उल्लेख नाही. तरी याबाबत कुठलाही करार व प्रकल्प हस्तातिकरण झालेले नाही. तसे झाले असते तर शेतक-यांना १५७ अंतर्गत नोटिसा आल्या असता.

त्यावेळी अध्यक्ष यांनी सांगितले की माझी सर्वांना विनंती आहे की आपण उपस्थित केलेले मुद्दे रास्त आहेत आणि १५७ अंतर्गतचा मुद्दाही इतिवृतात घेण्यात आलेला आहे. अशा प्रकारची अंतिम परवानगी जर राज्य शासनाने दिलेली नसेल तर पुढे तो प्रकल्पच होणार नाही.

आजची ही जनसुनावणी ईआयए अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्पास भारत सरकारने पारित केलेल्या टीओआर नुसार आहे. आपण इतर मुद्दे जे उपस्थित करत आहेत, त्याचीसुध्दा नोंद घेण्यात आलेली आहे.

त्यावेळी श्री जोतिबा रामचंद्र बावधणे, सरपंच, ग्रामपंचायत, निवकणे, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा यांनी सांगितले की म्हारवंड, निवकणे आणि भारसाखळे या तीन्ही गावांचा रेकॉर्ड दुरुस्तीचा विषय गंभीर आहे. ते रेकॉर्ड दुरुस्तीचे काम चालु आहे. ते काम पुर्ण होऊ द्यावे.

त्याचप्रमाणे निवकणे धरणग्रस्तांचा विषय हा मार्गी लागू द्यावा. नंतरच जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी. आता पर्यावरणाची चर्चा करुन काहीही उपयोग नाही.

अध्यक्ष यांनी सांगितले की आता जे दोन मुद्दे महत्वाचे मांडले की रेकॉर्ड दुरुस्ती आणि निवकणे धरणग्रस्त पुनर्वसन. तर त्याची नोंद घेण्यात आलेली असून संबंधित विभागांनाही सूचना देण्यात येईल. ते झाल्यानंतरच प्रकल्पाबाबत धोरण ठरविण्यात यावे याची नोंद घेण्यात आलेली आहेत.

त्यावेळी सरपंच, निवकणे यांनी प्रतिपादन केले रेकॉर्ड दुरुस्ती आणि निवकणे धरणग्रस्त पुनर्वसन त्यानंतरच पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

अध्यक्ष यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबत स्पष्टीकरण दिल्याचे सांगितले. आयोजक यांनी जनसुनावणी सुरु करतानाच सांगितलेले आहे की ही जनसुनावणी आपल्या सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठीच आहे. तसेच कंपनी व्यवस्थापनास आपण उपस्थित केलेल्या सर्व आक्षेपांना उत्तर देण्यास बंधनकारक आहे.

३०) श्री चैतन्य हरिषचंद्र दळवी, राहणार-जुनगती, जिल्हा-सातारा यानी आक्षेप नोंदविला की ही जनसुनावणी शासनाने आयोजित केलेली आहे. शासनाचे धोरण आधि पुनर्वसन नंतर धरण असे आहे. गेले २५ वर्षे धरणग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही, तसेच त्याशिवाय जर धरण अदानीला हस्तांतरित झालेच नाही, तर ही जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे. तरी आजची सुनावणी रद्द करुन संबंधित सर्व विभागांचे अधिकारी बोलावून परत जनसुनावणी घ्यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपला आक्षेप नोंदविण्यात आलेला असून उपस्थितांनी सदरहू जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे असे मांडलेले मत याचीही नोंद घेण्यात आलेली आहे. शासन आम्हांला पुढील आदेश देईल.

३१) त्यावेळी श्री **सुरज विनायक पाटणकर यांनी सुनावणी रद्द करण्याची मागणी केली, कारण ग्रामस्थ म्हणून आमचा अधिकार आहे.** आपण शासनाचे प्रतिनिधी आहात. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की जनसुनावणीच रद्द करण्यातो यावी. कारण आमच्या प्रलंबित मागण्यांचा आपण विचारच करत नाहीत. महसूल, वन विभागाकडे आमच्या मागण्या अनेक वर्षे प्रलंबित असताना पर्यावरणाचा विचार कसा करता येणार?२००१ पासून काम चालू आहे, त्याचा अजूनही मोबदलाच दिलेला नाही. जुना प्रकल्प अपुर्ण आहे. तर आम्हांला ही जनसुनावणी नको आहे, की हा प्रकल्प आमच्यावर लादू नका. अन्यथा प्रखर विरोधास सामोरे जावे लागेल.

३२) **श्री शरद यादव, गाव-मराठवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा:-**

यांनी सांगितले की जनसुनावणी ही रद्द झालीच पाहिजे ही आमची मागणी आहे. आपल्या भोळ्या शेतक-यांना फसवून जमिन ही त्याच्याकडून विकत घेतली जाते. प्रकल्प क्षेत्राच्या ७०% या कंपनीने जागा विकत घेतलेली आहे. याचा विचार करण्यात यावा.

३३) **श्री सुरज विनायक पाटणकर यांनी सुनावणी रद्द करण्याची मागणी केली** आम्हांला प्रकल्पसुध्दा नको आहे. महाराष्ट्र शासनाने बळजबरी करु नये. ही विनंती करतो. तुमचे आम्हांला काहीही नको आहे. या प्रकल्पामुळे आमचे अस्तित्वच जर संपणार असेल, तर या जनसुनावणी कशासाठी घेत आहात. आम्हांला प्रकल्प नको. अध्यक्ष व समितीच्या सर्व सदस्यांना विनंती आहे.

येथे काही उपस्थित लोक बैठकीवर बहिष्कार टाकून निघून गेले.

त्यावेळी **श्री जोतिबा रामचंद्र बावधणे, सरपंच, ग्रामपंचायत, निवकणे, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा** यांनी सांगितले जोपर्यंत रेक़ॉर्ड दुरुस्ती व निवकणे धरणग्रस्तांचे पुनर्वसन होत नाही, तोपर्यत कुठलाही ग्रामस्थ या बैठकीस उपस्थित राहणार नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ग्रामस्थांनी रेक़ॉर्ड दुरुस्ती व निवकणे धरणग्रस्तांचे पुनर्वसन याबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ही बाब शासनास अवगत करण्यात येईल. त्याचप्रमाणे संबंधित विभागांनाही याबाबत पुर्वसूचना देण्यात येईल. उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्दे रास्त असुन प्रथम त्याचे निराकरण करण्यात यावे व नंतरच पुढील कार्यवाही करावी अशी नोंद इतिवृत्तात घेण्यात आलेली आहे.

तरी मी अध्यक्ष या नात्याने उपस्थितांना विनंती करतो की त्यांनी जनसुनावणी बैठकीत सक्रिय भाग घ्यावा व सादरीकरणातील पर्यावरणविषयक योजनांबाबत आपले मत, सूचना/आक्षेप नोंदवावेत.

त्यावेळी काही उपस्थितांनी आम्हांला हा प्रकल्पच नको आहे ही मागणी केली. त्यावेळी अध्यक्ष यांनी या मुद्द्याचीही नोंद घेण्यात आल्याचे सांगितले. त्यावेळी काही ग्रामस्थांनी सांगितले की आम्ही इतरांना वीज देण्याचा ठेका घेतलेला नाही. आमचे येथील अस्तित्वच संपणार आहे.

आयोजक यांनी सांगितले की उपस्थितांचे जे काही आक्षेप प्रस्तावित प्रकल्पाविषयी आहेत, त्याची नोंद घेऊन ते सर्व शासनास कळविण्यात येतील.

आयोजक यांनी उपस्थितांना विनंती केली की जे उभे आहेत, त्यांनी बसून घ्यावे, जेणेकरुन इतरांच्या सूचना, विचार, आक्षेप नोंदविता येतील.

३४) **श्री महेश शेलार, राहणार-कोयनानगर:-**

मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा कार्यालय यांना लेखी स्वरुपात सूचना पोच केलेल्या आहेत. त्या मी परत येथे वाचून दाखवित आहे-

अ) ज्या संस्थेने ईआयए अहवाल तयार केला, तो कोणत्या महिन्यात तयार केलेला आहे?

ब) या परिसरात दुर्मिळ वनस्पती आहेत, त्याची यादी तयार केलेली आहे काय, त्यांचे संरक्षण व संवर्धन याबाबत नियोजन,

क) तसेच येथे वन्यजीव क़ॉरिडॉर आहे, तो या प्रकल्पामुळे नष्ट होईल काय? त्याबाबत नियोजन.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण जे लेखी आक्षेप किंवा ईमेलव्दारे आमच्या कार्यालयात पाठविलेले आहेत, ते सर्व लेखी सूचना, आक्षेप हे Environment Appraisal Committee, Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India यांना सादर करणार आहोत. त्याबाबत पुढील निर्णय ती समिती घेते.

आयोजक यांनी सांगितले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचा मुळ उद्देश प्रस्तावित प्रकल्पाबाबत प्रकल्प बाधित ग्रामस्थांनी, स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सूचना.टीकाटिप्पणी, आक्षेप यांची नोंद घेऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करु न ते अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मान्यतेने आणि मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे शासनास सादर करणे एवढाच आहे. बाकीच्या प्रश्नांना प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील.

त्यावेळी उपस्थितांमध्ये आपसात मोठमोठ्याने चर्चा, गोंधळ चालू होता.

३५)<u>श्री बाबुजी बोडके, जवरातवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा</u> यांनी उपस्थितांना आवाहन केले की ही शासनाची बैठक आहे. आपण आपले आक्षेप मांडणे योग्य आहे. बाहेर जाऊन काहीही हाती लागणार नाही. आपल्या मागण्या जशा शासनास पोचल्या पाहिजेत, तसेच त्या कंपनी व्यवस्थापनासही कळल्या पाहिजेत. तरी कृपया गोंधळ घालू नये. येथे स्थानिकांना जे भोगावे लागते, ते आम्हांला चांगले माहित आहे. प्रकल्पास कोणाचा विरोध असेल,तर तोही मांडण्यात याव्यात. स्थानिकांनी लेखी स्वरुपात सूचना,आक्षेप नोंदविण्यात यावेत. माझ्या गावातील ९९% शेतकरी हे अल्पभूधारक झालेले असून आम्हांला शासनाकडून, तसेच कंपनीकडून काही गोष्टी घ्यायच्या आहेत. तरी कृपया आपण आपल्या सूचना शांततेने मांडाव्यात.

३६)<u>श्री बाळासाहेब सपकाळ, राहणार-सावरघर,जिल्हा-साताराः-</u>

सादरीकरणातील स्लाईड नं.२ मधील मुद्द्यांबाबत त्यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पाची पार्श्वभूमी सांगण्यात आलेली नाही. त्यामुळे ही जनसुनावणी चुकीच्या पध्दतीने चाललेली आहे. प्रकल्पाबाबत पार्श्वभूमी लोकांना माहिती नसल्याने लोकांना प्रकल्पाचा अभ्यासच करता आलेला नाही.

स्लाईड न.६ बाबत - खालचा रिझरव्हॉयर (lower reservoir) वरचा रिझरव्हॉयर (upper reservoir) आहे, त्यात बोगदा (टनेल) करण्यात येणार आहे. तर बैठकीत उपस्थित आक्षेप भूस्खलनाचे (land slide) प्रमाण वाढण्याची दाट शक्यता, तसेच येथील नैसर्गिक झरे, पाझर तलाव यांचे पाणी आटले जाणार आहे. त्यासाठी उपाययोजना. तसेच चार प्रमुख गावे ही प्रभावित होणार आहेत. तर बैठकीत प्रकल्प प्रवर्तक यांनी याबाबत प्रमाणपत्र (certification) देण्याचे आश्वासन दिलेले आहे. तर आमची मागणी आहे की प्रथम प्रमाणपत्र (certification) द्या, नंतरच ही जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

आयोजक व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना भूस्खलन व नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत याबाबत उत्तर देण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जलस्त्रोताबाबत भूगर्भातील जलस्त्रोताचा (ground water study) अभ्यास केलेला आहे का?

तसेच लोकांचे म्हणणे आहे की हे भूकंपप्रवण क्षेत्र आहे. तर आपण seismic zone study केला असल्यास त्याची माहिती द्यावी. तसेच structure stability कशी राखणार याबाबत माहिती देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली भूगर्भातील जलस्त्रोतांचा अभ्यास (ground water study) करण्यात आलेला आहे. .त्याचा उल्लेख ईआयए अहवालात, तसेच सादरीकरणातील ईएमपी मध्ये दर्शविलेला आहे. प्रत्येक भागात भूगर्भातील जलस्त्रोत (ग्राऊंड वॉटर) वेगवेगळे आहेत.

त्यावेळी श्री संजय निकम यांनी आक्षेप नोंदविला की एकूण २५६ पेक्षा जास्त झरे हे बाधित होणार आहेत. प्रकल्प विकास करताना आपण ब्लास्टींग करणारच आहात, त्यामुले झ-यांना इजा पोहोचेल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जमिनीवर कुठेही ब्लास्टिंग करणार नाही की त्यामुळे झ-याला इजा पोहोचेल. आम्ही अभ्यास केलेला आहे, मात्र आपणाकडे काही त्याबाबत कागदपत्रे असतील, तर ती देण्यात यावी, आम्ही त्यावरसुध्दा अभ्यास करु. तुम्हांला अधिकृत्त उत्तर (official reply) देण्यात येईल.

३७) त्यावेळी **<u>श्री शरद यादव, गाव-मराठवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा</u>** यांनी सांगितले की प्रामुख्याने मराठवाडीच्या झ-याचा विषय घेतो. आमचा झरा आतमध्ये असुन याठिकाणी धरण बांधण्यात येणार आहे. नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत हा धरणात जाणार आहे. तर आम्हाला त्या झ-याचे पिण्याचे पाणी कसे मिळेल?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की मराठवाडीच्या पिण्याच्या पाण्याची जबाबदारी आम्ही घेऊ. श्री शरद यादव यांनी सांगितले की पर्यावरणाचा विषय आहे म्हणून विचारणा करत आहे की आमचा नैसर्गिक स्त्रोत पाण्याचा तेथे आहे. माझा प्रकल्पास विरोध नाही, पण आम्हांला त्याच झ-याचे पाणी प्यायचे असेल तर काय करणार?

प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण दिले की कुठलेही नैसर्गिक जलस्त्रोत अबाधित ठेवण्याचा तांत्रिकदृष्या आटोकाट प्रयत्न करणार आहोत. त्यासाठी आपलीसुध्दा मदत घेण्यात येणार आहेत.

३८) **<u>श्री अजय यादव, मराठवाडी, जिल्हा-सातारा:-</u>**

माझा प्रकल्पास वैयक्तिक विरोध नाही. राज्यासाठी, देशासाठी या प्रकल्पाचा फायदा होईल या विश्वासाने आम्ही पाठिंबा देत आहे. त्याचबरोबर शेतक-यांचे हित जपले पाहिजे. जो झरा जमिनीखाली आहे, तेथे टाकी बांधून पाणी काढता येईल काय? आम्ही आतापर्यंत नैसर्गिक पाणीच पित आलेलो आहोत. तर आम्हांला दुसरा नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत मिळावा.

प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषण होणार का? त्यांनी विचारणा केली की धरणाच्या भिंतीपासून ५० मीटरवर माझे स्वतःचे घर आहे. तर आमचा काय विचार करणार? तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी ground level येऊन लोकांची कामे करावीत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जे काही आपले प्रश्न/आक्षेप आहेत, त्यांना लेखी स्वरुपातच उत्तर देण्यात येईल. तसेच जे काही सामाजिक काम प्रकल्प परिसरात करावयाचे आहे, त्यासाठी स्थानिकांना विश्वासात घेऊनच काम करण्यात येईल.

३९)**श्री शरद यादव, गाव-मराठवाडी,तालुका-पाटण,जिल्हा-सातारा**

यांनी सांगितले की आमच्या गावाच्या १२ मागण्या आहेत. त्यावेळी काही उपस्थितांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने त्याबाबत प्रश्न विचारण्यात यावे. तसेच इतरांनाही संधि द्यावी, एकाच व्यक्तीला वारंवार बोलण्याची संधि देऊ नये.

येथे आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू बैठक ही पर्यावरणविषयक बैठक आहे, त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना/आक्षेप हे उपस्थित करण्यात यावेत. तरीही मा. अध्यक्षांच्या सूचनेनुसार बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या इतर मुदद्यांचाही इतिवृतात समावेश करण्यात आलेला आहे, मात्र तेच तेच मुद्दे उपस्थिक करु नये.

४०)**श्री बाळासाहेब सपकाळ, राहणार-सावरघर,जिल्हा-साताराः-**

**स्लाईड नं. ६**

येथून खाली ८.० कि.मी. अंतरावर ते लहानसे साखरी-चितेघर धरण आहे. पहिल्या फिलिंगसाठी वरच्या धरणातून पाणी आणणार आहेत. ते पाणी पाईपलाईनमधून आणणार का टँकरमधून आणणार याचा उल्लेख नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जे पाणी पावसाळ्यात वाया जाते, ते पाणी २-३ सिझन पाईप टाकून पंपिंगने घेणार आहोत. ती योजना WRD ने मंजूर केल्याशिवाय ती अंमलात येणार नाही. जसे सादरीकरणात दर्शविल्यानुसार WRD ने ती योजना अजून मंजूर करावयाची आहे. त्यांच्या मंजूरीशिवाय आम्ही पाणी घेऊ शकत नाही.

श्री सपकाळ यांनी आक्षेप नोंदविली की हा अहवाल चुकीचा बनविलेला आहे. कारण साखरी-चितेघरमधून पाणी घेणे शक्यच नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की निवकणेमधून पाणी स्पील वेने (spill way) सोडणार आहोत. WRD ने मंजूर केलेल्या योजनेनुसारच पाणी घेता येते. आम्हांला विना परवाना पाणी अडविण्याची परवानगी नाही. श्री सपकाळ यांनी आक्षेप नोंदविला की हा मुद्दा तांत्रिकदृष्ट्या चुकीचा आहे असे माझे मत आहे याची नोंद घेण्यात यावी.

४१)**श्री संजय निकम यांनी मत मांडले की** याचा अर्थ निवकणे धरणाबरोबर साखरी-चितेघर धरण हे सुध्दा या प्रकल्पात आले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की फर्स्ट फिलिंगसाठीच आम्ही घेणार आहोत. WRD ने मंजूर केलेली नाही.

त्यावेळी उपस्थितांनी विचारणा केली की बाष्पीभवनातून पाणी गेल्यानंतर ते पाणी आपण साखरी-चितेघर येथूनच घेणार आहेत. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की फक्त १.६ एमसीएम पाणी घेणार आहोत.

४२)त्यावेळी श्री (नांव सांगितले नाही) विचारणा केली की सकाळपासून आपण सादरीकरण दाखवित आहात. तर पर्यावरण सल्लागार संस्था कोणती आहे? ती शासनाने मान्य केलेली आहे काय?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ईआयए अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरण सल्लागार हे भारत सरकारच्या नाबेट मंजूरी प्राप्त झालेले पर्यावरण सल्लागारच ईआयए अहवाल तयार करु शकतात.

तर त्यांनी सर्वेक्षण हे योग्य प्रकारे केलेले नाही. कारण त्यांनी पक्षी, प्राणी येथे असल्याचे सांगितले. येथे दिवसासुध्दा लोक बाहेर पडण्यास घाबरतात. या स्थानापासून ०.५ कि.मी. व्याघ्र प्रकल्प आहे. एवढ्या कमी अंतरावर असतानाही येथे एकही बिबटया दिसलेला नाही. त्यांनी येथे येऊन सर्वेक्षण केलेले आहे वा गुगल सर्च करुन अहवाल तयार केलेला आहे.

संबंधित प्रकल्प विकास करताना प्राण्यांचे, झाडांचे जे नुकसान होणार आहे, त्याबाबत ईआयए अहवालात उल्लेखच नाही. ही एजन्सी फेक आहे काय? का अदानी कंपनीच्या सोयीस्कर हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ईआयए अहवालात चॅप्टर ३ मध्ये संपुर्ण प्राण्यांची आणि झाडांची यादी आहे. त्यात एकही बिबट्या दिसला नाही, आम्ही स्थानिक रात्री येथे यायला घाबरतो. या पर्यावरण सल्लागार यांनी स्थानिक किती लोकांना समाविष्ट केलेले आहे? सर्वेक्षण कसे केले याबाबत काहीही माहिती नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात संपूर्ण माहिती दिलेली नाही. परंतु अहवालात संपूर्ण माहितीचा उल्लेख आहे.

४३) येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वेक्षण करताना जी पध्दत (Methodology) वापरली ती सांगा, म्हणजे त्यांना सर्वेक्षणाची सत्यता व निकष लक्षात येईल.

त्यांनी अदानीचे जे अधिकारी आहेत, ते सक्षम आहेत का, त्यांना ती एखादी मागणी मान्य करण्याची परवानगी आहे का?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडताना प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की बैठकीत प्रकल्प व्यवस्थापनाविषयी लोक साशंक आहेत. त्याला कारण प्रकल्प व्यवस्थापनाचा जनसंपर्क चांगला नाही. यासाठी आपण चांगला माणूस नेमा, त्याला लोकांशी बोलण्याची संधि द्या. तरी आपण जी संस्था नेमणार आहात, ती पारदर्शक काम करेल हे बघा. जर आपण सहकार्य व जनसंपर्क ठेवला, तर लोक आपणहून सहकार्य करतील.

४४) <u>श्री भारत पाटणकरसर</u>

लोक आंदोलन करतात. पाटबंधारे विभागाकडे बैठक लावण्यास मी तुम्हांला फोर्स केले. त्यांनी सांगितले की प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी उत्तर देतात हे मला व उपस्थितांनाही माहित नव्हते. तर आपण सर्वांना फोन नंबर द्यावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जर पर्यावरण सल्लागार यांनी चुकीचे सर्वेक्षण व चुकीचा अहवाल केल्यास, त्यांचे मान्यता ही रद्द होत असते.

४५) **येथे** आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की सादरीकरणात मुद्दे हे प्रातिनिधिक आहेत, मात्र ईआयए अहवालात संपुर्ण माहिती आहे.

४६) **<u>श्री महेश शेलार, राहणार-कोयनानगरः-</u>**

अ) त्यांनी विचारणा केली की ज्या संस्थेने ईआयए अहवाल तयार केला, तो कोणत्या महिन्यात तयार केलेला आहे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्वेक्षण डिसेंबर, २०२४ ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत करण्यात आले.

आ) येथे वन्यजीव क़ॉरिडॉर आहे, तो या प्रकल्पामुळे नष्ट होईल काय? त्याबाबत नियोजन.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्प हा वन्यजीव कॉरिडॉरच्या बाहेर आहे. त्यामुळे वन्यजीव कॉरिडॉर प्रकल्पामुळे नष्ट होणार नाही.

श्री महेश शेलार यांनी आक्षेप नोंदविला की आपणास मुंगुस आढळला असे अहवालात लिहिलेले आहे. पण येथे मुगुंसच्या तीन जाती आहेत. तसेच फुलपाखरे आढळली, मात्र येथे विविध जातींची फुलपाखरे आहेत. तसेच शेड्युल १ मध्ये सस्तन प्राणी येत असतील.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ईआयए अहवालात स्वतंत्र यादी टाकलेली आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ईआयए अहवालात जो Ecological Chapter आहे, त्यात पूर्ण यादी फुलपाखरांची टाकलेली आहे. तसेच सर्व प्राणी व पक्षी यांची यादी आहे. तसेच शेड्युल १ मध्ये जे सस्तन प्राणी येतात त्यांची यादी दिलेली आहे. तसेच त्याच्यात संवर्धन योजना (conservation plan) तयार केलेली आहे.

श्री शेलार यांनी प्रश्न विचारला की येथील स्थानिकांना कुठले पक्षी कुठल्या हंगामात येतात याची माहिती असते. तर त्यांच्याबरोबर याबाबत चर्चा केलेली आहे काय? कारण स्थानिकांना जास्त माहिती असते की येते सरपटणारे प्राणी किती प्रकारचे आहेत? तर त्यावेळी स्थानिकाना विश्वासात घेणे गरचेचे होते.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सर्वेक्षणाच्या वेळी प्राथमिक डेटा असताना स्थानिकांना विचारणा करुनच व्दितीय डेटा (सेकंडरी डेटा) तयार करण्यात आला.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अंदाजपत्रकात तरतुद करुन येथील पक्षी व प्राणि यांच्यासाठी संवर्धन योजना (conservation plan)तयार केलेला आहे.

<u>४७)श्री. नांव सांगितले नाही</u>

दिवसा नाही पण रात्री सर्व प्राणी येथे रस्त्यावर असतात. गवे दिसतात, तर बिबटे कुत्री उचलायला येतात.

<u>४८)श्री संजय पवार, राहणार-भारसाखळे,तालुका-पाटण,जिल्हा-साताराः-</u>

माझा प्रश्न आहे की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सांगेत की सर्व ग्रामपंचायतीस ईआयए अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मात्र भारसाखळे ग्रामपंचायतीस अजूनही मिळालेला नाही. मी मुंबईहून जनसुनावणीस आलेलो आहे. आम्ही येथील लोकांना जनसुनावणीची माहिती दिली. आपण दवंडी दिली आहे काय?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्व ग्रामपंचायत कार्यालयांना अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याची पोचपावती आहे.

तसेच सर्वेक्षण करण्यास लोक येतात, आम्हीसुध्दा सहकार्य करु, मात्र त्यांनी आमच्या खाजगी जागेत सर्वेक्षण करत असतील तर त्यांनी जमीन मालकाला सांगावे. त्यासाठी जमिन मालकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्वेक्षणास येणा-या सर्व माणसांची यादी ग्रामपंचायत कार्यालयात देण्यात येईल. सर्वाशी संपर्क करण्यासाठी प्रकल्प अधिकारी उपलब्ध असतील.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांना अशी सूचना आहे की त्यांनी त्यांचा अहवाल डिजिटल स्वरुपात सर्वांना उपलब्ध करुन देण्यात यावा. दुसरी गोष्ट वाईल्ड लाईफ बोर्ड. तर Draft Plan काय आहे ते सांगा.

४९) सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की या जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रस्तावित प्रकल्पाविषयी प्रकल्प प्रभाव क्षेत्रातील_लोकांच्या भावना जाणून घेणे, प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानीकांच्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविणे व ते शासनास कळविणे हा आहे. आता येथे श्री भारत पाटणकर सरांनी बरेच महत्वाचे मुद्दे सांगितलेले आहेत. आपण उपस्थित करत असलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे व त्यांचा या बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल.

तसेच प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी जो पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल (ईआयए) तयार केलेला आहे, तो प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात व अधिसूचित शासकीय कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. हा ईआयए अहवाल हा प्रारुप (Draft) आहे.बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यां नुसार अंतिम ईआयए अहवाल तयार करण्यात येईल.

आपण मुद्दे उपस्थित केले, म्हणजे ईआयए मंजूर झाला असे नाही.

तरी आपले जे नैसर्गिक स्त्रोताबाबत जे मुद्दे आहेत, ते लेखी स्वरुपात देण्यात यावेत. आपण उपस्थित केलेले मुद्दे आम्ही त्या त्या शासकीय विभागास कळविणार आहोत. त्यांच्याकडून जे उत्तर येईल, ते आम्ही तुम्हांला देणार आहोत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रभाग क्षेत्रातील ज्या ग्रामपंचायती आहेत, तेथे कंपनीच्या अधिका-यांची समिती पाठवून ग्रामस्थाना समजेल अशा मराठी भाषेत त्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती ही उपलब्ध करुन देण्यात यावी. लोकांच्या मनात जो संभ्रम निर्माण झालेला आहे, तो दूर होण्यास मदतच होईल. त्यासाठी ग्रामसभा लावण्याची विनंती करण्यात यावी.

५०) श्री संजय पवार, राहणार-भारसाखळे,तालुका-पाटण,जिल्हा-साताराः-

त्यांनी सांगितल की ग्रामपंचायतीस आपली बैठकीची माहिती नोटिस बोर्डावर लावण्यास सांगावे, कारण ग्रामपंचायत कार्यालयास विचारले असता आम्हांला काहीही माहिती नाही असे सांगतात. अध्यक्ष यानी याबाबत खबरदारी घेण्याचे आश्वासन दिले.

५१) नाव सांगितले नाही

आपले कुठले गट नंबर जाणार याविषयी माहिती कंपनीने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच बाकी ठिकाणी अदानीचा रेट जमिन घेताना व येथील रेट या फार मोठी तुट का दिसते?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की तुमचे विचार चांगेल असतील, याबाबत काही दुमत नाही. पण प्रकल्प प्रवर्तक त्यांच्या खाजगी पध्दतीने जमिन विकत घेत आहेत.

५२) श्री बाळासाहेब सकपाळः-

यात स्लाईडव्दारे सांगावयाचे आहे की जैवविविधतेचा जो अभ्यास केलेला आहे, त्या सर्वेक्षणात स्थानिकाना समाविष्ट करण्यात आलेले नाही. यात लावलेले फोटो हे कॉपी पेस्ट असेच दिसतात. तरी हा अहवाल आम्ही मान्य करत नाही.

आयोजक यांनी आपण उपस्थित केलेल्या आक्षेपाची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

५३) श्री रामचंद्र मराठे, मराठवाडी ग्रामस्थ, जिल्हा-साताराः-

आमचे हे बाधित क्षेत्र आहे. हे पूर्णपणे जलाशयात जाणार आहे. २००५ साली कृषि खात्याने मातीबांदकाम पाटबंदारे म्हणुन नोंदविण्यात आले. आम्ही पिढ्यान पिढ्या ही जमीन कसत आहोत. प्रस्तावित प्रकल्पामुळे नैसर्गिक संपत्ती ही नष्ट होणार आहे. म्हणून या प्रकल्पास आमचा विरोध आहे,

आयोजक यांनी सांगितले की आपल्या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे.

५४) जल प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९७४ पासून विविध पर्यावरण कायदे संमत झालेले आहेत. ते सर्व कायदे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पारित केलेले विविध निर्देश कंपनीकडून त्याचे पालन होईल का?

प्रकल्प प्रवर्तक यानी सांगितले की सर्व काही निर्दशांनूसार त्याचे पालन करण्यात येईल. प्रकल्पात काहीही अवैध काम होणार नाही. पर्यावरण अनुमती मिळाल्यानंतरही ते बघावेच लागते.

आयोजक यांनी माहिती दिली की दर सहा महिन्यांनी शासनास संबंधित कंपनीचा अनुपालन अहवाल पाठवावा लागतो. आपली काही तक्रार असल्यास ती जिल्हाधिकारी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास पाठवू शकता. त्याची दखल घेण्यात येते. कंपनीचे विविध पर्यावरणीय नमुने गोळा केल्यानंतर दी दोषी आढळ्यास पर्यावरण कायद्यांतर्गत त्याविरुध्द कारवाई करण्यात येते.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की कंपनीस पर्यावरण अनुमती (ईसी) प्राप्त झाल्यानंतर म.प्र.नि.मंडळ संबंधित कंपनीस Consent to Establish (C to E) नंतर Consent to Operate (C to O) प्रदान करते. त्यातही सर्व अटी व शर्ती या पारित करण्यात येतात. जर कंपनीने त्याचे उल्लंघन केल्यास पुढील कारवाई करण्यात येते.

तसेच बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येते, आणि त्याप्रमाणे सुधारित ईआयए अहवालात त्यानुसार बदल करण्यात येतो. तरी उपस्थितांनी लेखी स्वरुपात सूचना, आक्षेप नोंदवावेत. ते सर्व ईएससी समोर ठेवण्यात येतात.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्व लेखी सूचना, आक्षेप हे बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येतील.

५५) <u>श्री शरद यादव, गाव-मराठवाडी,तालुका-पाटण,जिल्हा-साताराः-</u>

याठिकाणी धरण बांधण्यात येणार आहे. आम्हांला असे कळले की बोगद्यातून पाणी खाली सोडले जाणार आहे. भितींपासून आमचा ओढा ३००-४०० एकर क्षेत्र आहे, त्या ओढ्याला पाणीच जाणार नाही. खालचे क्षेत्र जेथे शेती, फळबागा आहेत, त्यांना पाणीच जाणार नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की WRD च्या निर्देशांनुसार आताचे नैसर्गिक स्त्रोत आम्ही अडवणार नाही. त्याला स्पील-वे दिलेला आहे, ते खाली सोडण्यात येईल.

५६) <u>श्री बाळासाहेब सपकाळ, राहणार-सावरघर,जिल्हा-साताराः-</u>

आम्ही सर्व आक्षेप नोंदविलेले आहेत.

त्यांनी विचारणा केली की प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाच्या अभ्यासक्षेत्रात कमी अंतरावर इतर प्रकल्प आहेत. ते होऊ शकतात आणि आमची यावर हरकत आहे.

त्यांनी आक्षेप नोंदविला की जरी पर्यावरण सल्लागार यांनी हिवाळा, पावसाळ्यापूर्वी व पावसाळा यात पाण्याचे विविध नमुने जरी गोळा केलेले असतील, तरीही ते स्थानिक नागरिकांसमोर गोळा केलेले नसल्यामुळे ते नमुने गोळा न करता अहवाल तयार करण्यात आला असा आमचा आक्षेप आहे.

आयोजक यांनी आक्षेपाची नोंद घेतल्याचे सांगितले.

श्री सपकाळ यांनी आक्षेप नोंदविला की चार गावे ही बाधित आहेत. त्यातील तीन गावांचे माती परिक्षण केलेले नाही. तरी उर्वरित गावांचे माती परिक्षण करण्यात यावे. आयोजक यांनी गावांची नावे सांगण्याची सूचना केली. श्री सपकाळ यांनी भारसाखळे, निवकणे या गावांचे मातीचे परिक्षण आवश्यक आहे.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की दहा गावांचे माती परिक्षण करण्यात आलेले आहे.

श्री सपकाळ यांनी आक्षेप नोंदविला की आरळ गाव हे पूर्णपणे पुनर्वसन करावे लागणार असून त्याबाबत कुठलाच उल्लेख सादरीकरणात व ईआयए अहवालात नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पुनर्वसनाबाबत पाटणकरसरांनी बऱ्याच सूचना दिलेल्या आहेत. तसेच त्यांनी ईएमपीबाबतही सूचना केलेल्या आहेत. तर पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकारी यांना हे मुद्दे अवगत करण्यात येतील. हा प्रकल्प प्रवर्तकाने झिरो दाखविला, राज्य सरकारकडून खर्च होईल.

श्री सपकाळ यांनी मागणी केली की हे सर्व होईपर्यंत कुठलीच प्रक्रिया करण्यात येऊ नये. ही चार गावे बाधित होणार आहेत, त्यांना पुनर्वसन कायदा लागू झाला पाहिजे. तो अहवाल आयुक्त, पुनर्वसन येथे सादर करेपर्यंत इतर कुठलीही प्रक्रिया करण्यात येऊ नये.

५७) <u>श्री भारत पाटणकरसर</u>

पर्यावरण व्यवस्थापन योजना पाहिल्यावर तारळी प्रकल्पाची आठवण होते. ती फक्त कागदावरच राहिली. तेथे एकही मुद्दा चालू झालेला नाही, त्यामुळे लोकांना येथेही तसेच होईल वाटते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की हाही मुद्दा मा. जिल्हाधिकारी यांच्यासमोर ठेवण्यात येईल. तारळी प्रकल्पातील निर्देश व सद्यस्थिती, तसेच या प्रकल्पातील निर्देश याचे अवलोकन करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्पासाठी जमिन खरेदी करताना पारदर्शकता ठेवण्याची सूचना केली. तसेच प्रकल्प प्रवर्तकांची जी माणसे हे काम पाहतात, त्यांचे फोन नंबर्स सर्व स्थानिकांना उपलब्ध करुन देण्याच येतील. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना ती अंमलबजावणीची सूचना केली.

५८) <u>श्री अमोल शेळके, राहणार-काठेवाडी, जिल्हा-साताराः-</u>

मराठवाडीत गट नं. ९२ मध्ये आमची जमिन साडेसोळा एकर जमिन आहे. तेथे अवैधपणे अर्धि जागा ही कंपनीने घेतलेली आहे. आम्हाला जमिन विकायची नाही, ती दुरुस्त करावयाची आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की मला वस्तूस्थिती माहित नाही. ती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

अध्यक्ष यांनी सांगितले बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रांत कार्यालय, तहसील कार्यालयास सूचना देतो की त्यांनी जे रेकॉर्ड दुरुस्तीचे काम आहे, ते विशेष शिबिर लावून त्याबाबत दखल घेतील.

**५९)श्री बाळासाहेब सपकाळ, राहणार-सावरघर,जिल्हा-साताराः-**

या प्रकल्पाची जी हद्द आहे, ती पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या मध्ये येते. कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पा हा काही मीटर अंतरावर आहे. या नैसर्गिक वातावरणात तेथील निसर्गाला त्रास देणारा प्रकल्प होऊ नये अशी माझी विनंती आहे.

पाटण तालुक्यात अनेक धरणे झाली, प्रकल्प आले. लोकांच्या जमिनी गेल्या. पवनचक्कीसाठी जमीनी गेल्या. जर जमिनी घ्यायच्याच असतील तर त्या भाडे तत्वावर घ्याव्यात व ४०-५० वर्षांनी परत द्याव्यात. तसेच येथे ज्या सूचना , आक्षेप प्राप्त झालेले आहेत, त्यांना उत्तरे ही लेखी स्वरुपात देण्यात यावीत.

हा प्रकल्प रद्द व्हावा हीच इच्छा आहे, मात्र जर प्रकल्प होणारच असेल तर, प्रकल्पग्रस्तांना त्याच्या शैक्षणिक आहर्तेनुसार त्यास प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. त्यासाठी बाधित गावातील ग्रामपंचायतीत नोटीस लावणयात यावी. येथील स्थानिकांना कायमस्वरुपी नोकरी द्यावी. स्थानिकाना प्राधान्य देण्यात यावे. प्रकल्पात ज्या संवर्गाची गरज आहे, त्याची सूचना आता द्या. म्हणजे आम्ही येथील मुलांना प्रशिक्षण आयोजित करु.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार. तसेच सर्व ग्रामपंचायत कार्यालयात प्रकल्पात किती लोकांची गरज आहे, किती संवर्गात किती लोकांना नोक-या देता येतील याचे सर्व माहिती आम्ही ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन देणार आहोत. स्थानिक युवक-युवतींनाच प्राधान्य देण्यात येईल.

स्थानिकांच्या सहकार्याने कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. तसेच भविष्यातील रोजगाराची गरज लक्षात घेऊन स्थानिक युवक-युवतींचा शिक्षणाचा खर्च, करार याबाबत सर्वांना विश्वासात घेऊनच योजना राबविण्यात येते.

**६०)श्री रामचंद्र मराठे, मराठवाडी ग्रामस्थ, जिल्हा-साताराः--**

मराठवाडीचा १६ नंबर आहे. तेथे ठराविक लोकांच्याच नावावर जमिन आहे. दुस-या भावाचे नांव नाही. म्हणून ते सार्वजनिक रान म्हणून ठेवलेले होते. तरी सर्व लोकांचा विचार करुनच पुढील निर्णय घेण्यात यावा.

**६१)एडव्होकेट सिध्देश बापुसाहेब पवार, राहणार-बांबवडे, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-**

माझा ईआयए अहवालावर आक्षेप आहे. आपण जो पर्यावरण सल्लागार नेमला आहे, त्याच्यावर आपला आंधळा विश्वास आहे. त्यांनी प्रत्यक्षात जागेवर येऊन काम केले का? डिसेबर, २०२४ मध्ये किती दिवस सर्वेक्षण करण्यात आले? यात त्याचा उल्लेख नाही. तसेच त्या पर्यावरण सल्लागाराची किती लोक येथे सर्वेक्षणास आलेले होते? भारत सरकारची पर्यावरण सल्लागार यांना जी मान्यता आहे, ते सर्टिफिकेट जोडणे आवश्यक होते. एप्रिल, २०२५ ते ऑगस्ट, २०२५ देखरेख कालावधी अहवालात दाखविलेला आहे. मात्र आपणास स्कोपिंग मंजूरी ही देखरेख कालावधीनंतर मिळालेली आहे. अहवालात निवकणे प्रकल्प अंशतः पूर्ण आहे. याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की WRD च्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. त्यांनी ३३ मीटरचा बंधारा बांधलेला होता. मात्र WRD ची योजना पूर्ण केलेली नाही. १९९९ ला प्रकल्पाचे नियोजन होते, मात्र अजुन झालेला नाही, शासनाने विनंती केली, म्हणून आम्ही तो पूर्ण करण्यासाठी तयार झालो.

प्रकल्पाचा दृष्टीकोन काय आहे हे ईआयए अहवालात नमुद नाही. यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित करत आहात. मात्र ते सर्व लेखी देण्यात यावेत. हा ईआयए अहवाल हा प्रारुप (ड्राफ्ट) आहे. हा सुधारित (revised) अहवाल नाही. आपले मुद्दे लेखीस्वरुपात सादर करण्यात यावेत. ते सुधारित (revised) अहवालात अंतर्भूत करण्यात येतील.

त्यावेळी एड्व्होकेट पवार यांनी तारळी प्रकल्पाचा उल्लेख केला. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्याबाबत परत विचारणा करण्यात येऊन आपणस कळविण्यात येईल.

एड्व्होकेट पवार यांनी आक्षेप नोंदविला की पुणे जिल्ह्यातील वीर धरणाजवळ (७७ कि.मी.) आपण प्रकल्पातून वीज नेणार आहात. त्याबाबत काहीही माहिती ईआयए अहवालात नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की या प्रकल्पास मंजूरी जरी मिळायची आहे, तरीही ती योजना पॉवर ग्रीड ऑफ इंडिया, भारत सरकार तो प्रकल्प भविष्यात राबविणार आहे.

चर्चेमध्ये वीजेचा टॉवर बाबत चर्चा करताना अध्यक्ष यांना सांगितले की त्याबाबत शासनाचे धोरण हे ठरलेले आहे.

एड्व्होकेट पवार यांनी प्रस्तावित प्रकल्पातील मनुष्यबळाबाबत विचारणा केली. आपण ७०% स्थानिक अपेक्षित आहे असे लिहिलेले आहे. प्रकल्पात जास्तीतजास्त स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे.

येथे अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना employment plan घोषित करण्याची सूचना केली. प्रस्तावित प्रकल्पात प्रत्येक स्टेजला किती माणसे लागतील, कुठल्या संवर्गात (category) किती लागतील याचा तपशील सर्वांना उपलब्ध करुन देण्यात यावा. अध्यक्ष यांना मत मांडले की कंपनीने संबंधित उमेदवाराशी प्रत्यक्ष संपर्क ठेवणे आवश्यक आहे. स्थानिकांची इच्छा असते, त्यांना गावातच काम मिळावे, ते मिळाले तर त्यात प्रकल्पाचा फायदाच आहे.

एडव्होकेट पवार यांनी ईआयए अहवालात ठोस आकडेवारी नसल्याचे आक्षेप नोंदविलेला आहे. वस्तूस्थितीप्रमाणे आकडेवारी नाही. नं. ६ क्षेत्र सर्वेक्षण हे कोणी केलेले आहे. त्यात किती स्थानिक लोकांचा सहभाग, स्थानिक तज्ज्ञाचा सहभाग घेण्यात आला? त्यामुळे प्रत्यक्ष सर्वेक्षण केले नाही तर गुगलवरुन अहवाल तयार करण्यात आला असा संभ्रम स्थानिकांमध्ये निर्माण झालेला आहे.

येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेल्या आक्षेपांना लेखी स्वरुपात उत्तर देण्यात येईल. एडव्होकेट पवार यांनी आक्षेप नोंदविला की आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प आणत आहात, तर आकडेवारी ही योग्य असणे अपेक्षित आहे. कारण पाटण तालुका हा आता भूमीहिनांचे घर झालेले आहे.

ईआयए अधिसूचना, २००६ च्या नुसार प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात पर्यावरण सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे. अहवालात सह्याद्रि वाघ प्रकल्प राखीव जंगल हे ०.५ कि.मी. आहे, तर पुढे ८-९ कि.मी. आत जाऊन आपण सर्वेक्षण केले का? जर केले असेल, तर आपणास एकही बिबटया किंवा जंगली श्वापदे कसे आढळले नाही?

अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी फक्त आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

पुढील आक्षेप- १० कि.मी. च्या आत तारळी प्रकल्पाचे काम चालु आहे. मात्र त्याचा उल्लेख अहवालातच नाही. तसेच कोयना जलाशयाच्या पुढे ५.० कि.मी. बफर झोन आपण सांगितलेला आहे. तसेच तेथे सर्वेक्षण करण्याची परवानगी वनविभागाने दिली का? आपण १० कि.मी. सर्वेक्षण केले ही बाब आक्षेपार्य आहे.

येथे अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना सूचना केली की सिसमिक झोन कोणता व त्याबाबत अभ्यास करण्यात आलेला आहे काय? तसेच structure stability बाबत जी उपाययोजना करणार आहात त्याची माहिती देण्यात यावी. तसेच प्रकल्पाचा आपत्कालीन व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) तयार केलेली असेल, त्याबाबत माहिती ईआयए अहवालात असणे आवश्यक आहे. त्यासाठी असणारी Alert system बाबत माहिती अंतर्भूत करण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की सिसमिक झोनची माहिती ईआयए अहवालात आहे. एडव्होकेट पवार यांनी आपत्कालीन परिस्थितीत काय उपाययोजना करणार याची माहिती नाही हा आक्षेप नोंदविला व ती देण्यात यावी अशी मागणी केली.

एडव्होकेट पवार यांनी हवामान शास्त्राचा मुद्दा उपस्थित केला. त्याता वा-याचा वेग, तापमान याबाबत आकडेवारी दिलेली आहे, ती केव्हा, कोठे व कुठल्या यंत्राने केली याची माहिती देण्यात यावी. तसेच ईआयए अहवालात जैववैविधतेबाबत ठोस माहिती नाही. माशांच्या प्रजाती सांगितल्या आहेत, पण कोणता हा उल्लेख नाही.

६.१३ - सामाजिक पर्यावरण -

सर्वेक्षण करताना किती लोकांनी पाहिले हा महत्वाचा मुद्दा आमचा आहे. आपण लिहिता, १२४ गावे १० कि.मी. त्रिज्येमध्ये आहेत व तेथे सर्वेक्षण केलेले आहे. मी ज्या गावात राहतो, तेथे सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

माझा आक्षेप आहे की हा वातानुकुलिन केबिनमध्ये तयार केलेला अहवाल आहे.

६.१३ मध्ये - लोकसंख्या - सामाजिक स्थिती § येथे तुमच्या संस्थेन सर्वेक्षण केलेले नाही. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भारत सरकारच्या सेन्सस अहवालातून घेण्यात आलेले आहे. एडव्होकेट पवार यांनी आक्षेप नोंदविला की तसा उल्लेख अपेक्षित होता.

नं. ७ - परिणाम आणि प्रतिबंधक उपाय-

यात परिणाम देण्यात आले व उपाय सांगण्यात आलेले नाहीत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की आपण कार्यकारी सारांश अहवाल वाचत आहात. कोरोना महामारीत जग होरपळुन निघाले. तर अशा वेळी आपल्याकडे काय प्रतिबंधात्मक उपाय आहेत ते नमूद करणे योग्य होते.

अहवालात १०,००० झाडे तोडणार असे लिहिलेले आहे, तर त्याचे मुल्यांकन कसे करण्यात आले? तर त्या झाडांचे टॅगिंग करण्यात आलेले आहे काय? याबाबत संपुर्ण माहिती नाही हे आक्षेपित आहे.

पुनर्वसन - ३४६ कुटुंबाचे पुनर्वसन होणार आहे. त्यातील २५ कुटुंब हे विस्तापित होणार आहे असे नमुद करण्यात आलेले आहे. ही माहिती अपूर्ण आहे - कारण चार गावांतील २५ का एका गावातील २५ याबाबत स्पष्टीकरण नाही.

या प्रकल्पामुळे लोक बाधित होणार, झाडांची कत्तल होणार अशा प्रकल्पास माझा पूर्ण विरोध आहे. स्थानिक जनतेचा फायद्याचा विचार न करता उद्योगपतींचा फायदा विचारात घेतलेला आहे.

या प्रकल्पाच्या ४.० कि.मी. अंतरावर दुसरा असाच प्रकल्प आहे. तरी येथे हा प्रकल्प नको.

६२) श्री नांव सांगितले नाही

येथील स्थानिक भाषा मराठी आहे. मात्र ईआए अहवाल हा इंग्रजीत उपलब्ध करण्यात आला. त्यामुळे प्रकल्पाचे तोटे व फायदे सामान्य लोकांना कळलेच नाही. चुकीच्या पध्दतीने ही जनसुनावणी घेण्यात आलेली आहे. म्हणून या प्रकल्पास विरोध आहे.

६३) <u>श्री भारत पाटणकरसरः-</u>

तारळी प्रकल्पात करारामध्ये कलम असतानाही तारळी व्यवस्थापन माती कुठे टाकत होते, आम्ही आंदोलन केल्यानंतर माती उचलली जाते. उपस्थितांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. हा मल्टी-सेक्टरोल प्रकल्प आहे, त्यांनी सूचना केली की गावातील एंजट हे बंद झालेले पाहिजेत. आक्षेपांची पूर्तता केल्याशिवाय आपण प्रकल्प उभारु शकणार नाही.

६४) <u>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>

त्यांनी प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सांगितले की आपणस माहित आहे की हा हायड्रो पॉवर प्रकल्प असून पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आहे. तरी यासंदर्भात आपण जेवढा जनसंपर्क कराल, जेवढी माहिती लोकांना समजेल अशा भाषेत त्यांना उपलब्ध करुन द्याल, तेवढे देशाचा फायदा आहे. आपण २७०० मेगावॅट प्रकल्प उभारणी करत आहात, हा काही छोटा प्रकल्प नाही. प्रस्तावित प्रकल्पामुळे लोकांना नैसर्गिक स्त्रोत नष्ट होणे, जमिन अधिग्रहण, पुनर्वसन याबाबत शंका आहेत. तर आपणैस शक्य असेल तर ग्रामपंचायत स्तरावर बैठक घ्या, त्यांना प्रकल्पाची माहिती द्या.

प्रकल्प प्रवर्तकांनी ज्या काही त्रुटी अहवालात, जनसंपर्कात झालेल्या आहेत त्यात सुधारणा करण्यात येतील असे आश्वासन दिले.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त, सुधारित पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेपांसह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की बैठकीत चर्चा करताना काही त्रुटी आढळ्या त्या म्हणजे पारदर्शकितचा अभाव, जनसंपर्क नसणे, स्थानिकांना रोजगाराची संधि, स्थानिकांना रोजगारक्षम करण्यासाठी कौशल्यविकास कार्यक्रमाचे नियोजन अहवालात नसणे, आणि पुनर्वसनाबाबत ठोस कार्यक्रम नसणे.

अध्यक्ष यांनी पुनर्वसनाबाबतत उपस्थित केलेल्या मुद्यांवर मा. जिल्हाधिकारी,सातारा यांच्याबरोबर लवकरात लवकर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

प्रकल्प प्रवर्तकांना सूचना आहे की त्यांनी गावात ग्रामसभा घेऊन, जनतेत कॉर्नर मिटिंग्ज/कोपरा बैठका घेऊन जनजागृती निर्माण करावी तरच लोक सहकार्य करतील. प्रकल्प प्रवर्तक लोकांकडून सहकार्याची अपेक्षा करत आहे, तर लोकांनाही प्रकल्प प्रवर्तकांनी सहकार्य करणे अपेक्षित आहे. लोकांच्या लढ्याला सुस्कृंत नेतृत्व भारत पाटणकरांच्या रुपाने मिळालेले आहे. ते कायदा हातात घेणार नाहीत, मात्र ते शासकीय नियामक विभागाकडे पाठपुरावा करतील.

आयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले आणि त्यांनी मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

जाहिर जनसुनावणीबाबत एकूण २१४ लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झाले आहेत.

**(अमोल आ.सातपुते)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,सातारा

**(बाबासाहेब कुकडे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(नागेश पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा - सातारा